आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.com





# दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ०७ वे ● अंक २४५ वा ● रविवार दि. ११ फेब्रुवारी २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●


## यंत्रमागधारकांना उभारी देण्यासाठी शासन सकारात्मक निर्णय घेणार

मालेगाव, (उमाका) : देशात शेतीनंतर मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती यंत्रमाग व्यवसायाच्या माध्यमातून होते. त्याअनुषंगाने जिल्ह्यातील यंत्रमागधारकांना, वस्त्रोद्योग व्यवसायाला व लघुउद्योगाला उभारी देण्यासाठी समितीच्या अहवालाच्या माध्यमातून शासनस्तरावर सकारात्मक निर्णय घेण्यात येतील, असे प्रतिपादन राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले. मालेगाव येथे विविध यंत्रमाग कारखान्यांस भेट व यंत्रमागधारकांच्या विविध समस्यांबाबत बैठक डायमंड लॉन्स येथे मंत्री पाटील व पालकमंत्री दादाजी भुसे यांच्या उपस्थितीत पार पडली. यावेळी आमदार मौलाना मुफ्ती मोहंमद, मुंबई वस्त्रोद्योग विभागाचे प्रादेशिक उपायुक्त दिपक खांडेकर, नागपूर वस्त्रोद्योग आयुक्तलयाचे सहाय्यक आयुक्त (तांत्रिक) गणेश वंडकर, महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्या., मुंबईचे प्रशासकीय अधिकारी विजय पुजारी, वस्त्रनिर्माण निरीक्षक गजानान पात्रे, लेखाधिकारी ज्ञानेश्वर टिके, तांत्रिक सहाय्यक एस.बी. बर्मा, यंत्रमाग संघटनेचे चेअरमन साजिद अन्सारी यांच्यासह पदाधिकारी, कामगार व नागरिक उपस्थित होते.

## 'मराठी भाषेची चिंता आणि चिंतन' या विषयावर -स्व-बोलीभाषेत कवी कुसुमाग्रजांना पत्र लिहा राज्यस्तरीय खुली लेख स्पर्धा

मुंबई : मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई आणि




मनसे विभागध्यक्ष यशवंत किल्लेदार यांच्या पार्थ फाउंडेशन मुंबईच्या संयुक्त विद्यमाने २७ फेब्रुवारी रोजी कुसुमाग्रज तथा वि. वा. शिरवाडकर जन्मदिन आणि मराठी भाषा दिवस दरवर्षीप्रमाणे मान्यवर पाहुण्यांच्या उपस्थितीत धुरू हॉल, दादर सार्वजनिक वाचनालय येथे साजरा करण्यात येणार आहे. यावेळी ४९ व्या राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धेचे पारितोषिक वितरण होणार आहे.

यानिमित्ताने पार्थ फाउंडेशनच्या सहकार्याने मुबईसह संपूर्ण महाराष्ट्रातील वृत्तपत्र लेखक, निवृत्त व सध्या कार्यरत असलेले प्राध्यापक, शिक्षक, साहित्यिक, महाविद्यालयीन विद्यार्थी, मराठी भाषाप्रेमी यांच्यासाठी विनामूल्य 'मराठी भाषेची चिंता आणि चिंतन' या विषयावर या विषयावर स्व-बोलीभाषेत कुसुमाग्रज तथा कविवर्य वि वा शिरवाडकर यांना उद्देशून पत्रस्वरूपात राज्यस्तरीय लेख स्पर्धा 'आयोजित करण्यात आली असल्याची घोषणा संघाध्यक्ष रवींद्र मालुसरे यांनी केली आहे. कोणत्याही शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याला किमान मातृभाषेत लिहिता वाचता यावं या संकल्पनेच वाटोळं करणारे एक धक्कादायक विदारक चित्र अहवालातून महाराष्ट्रात समोर आले आहे. ते म्हणजे - बारावीच्या विद्यार्थ्यांना दुसरीच्या मुलांचे मराठी वाचता येईना ! त्यामुळे शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे. कोसकोसावर बदलणाऱ्या महाराष्ट्रातल्या अनेक बोलीभाषांनी आपली मराठी भाषा समृद्ध झाली आहे. खेड्यापाड्यातली मराठी भाषा रांगडी अशुद्ध आणि अपभ्रंश असलेली असते, कशीही असो ती 'मराठी' च म्हणून मराठी माणसाला आवडते. मराठी भाषेची सद्यस्थिती आपापल्या बोलीभाषेत व्यक्त करून स्पर्धेत भाग घेणाऱ्यांनी ६०० शब्दात लेख लिहावा यावा अशी अपेक्षा आहे, पहिल्या ३ जणांना रोख पारितोषिक,सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र व इतरांना सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात येतील. युनिकोड फॉट मध्ये टाईप करून दि २० फेब्रुवारी २०२४ पर्यंत लेख लहरश्रींरश्र१९४९सारळश्र.लो यावर पाठवावेत तसेच स्पर्धेचीअधिक माहिती, नियमावली व आगावू नोंदणी करण्यासाठी स्पर्धा समन्वयक दत्ताराम गवस ९२२०६१५२४५ यांच्याशी संपर्क करावा असे आवाहन प्रमुख कार्यवाह प्रशांत घाडीगांवकर आणि पार्थ फाउंडेशनचे अध्यक्ष यशवंत किल्लेदार यांनी केले आहे. स्व-बोलीभाषा म्हणजे अस्सल कोल्हापुरी, चंदगडी, आगरी, नागपुरी, मराठवाडी,अहिराणी, कोकणी, वऱ्हाडी, बेळगावी, मालवणी, मोरस मराठी, झाडीबोली, तंजावर, बगलांनी, नंदुरबारी, खाल्यांन्गी, वर्ल्यांगी, तप्तांगी, डोंगरांगी, जामनेरी, खानदेशी बाणकोटी, कोकणी, वऱ्हाडी, सोलापुरी किंवा महाराष्ट्रात इतर असलेल्या अपेक्षित आहेत.

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते स्व.सदाशिव गंगाराम भोरे कलामंदिरचे लोकार्पण

नाशिक, (जिमाका): नाशिक महानगरपालिकेतर्फे २५ कोटी रूपये निधी खर्चून हिरावाडी येथे साकारलेल्या स्व.सदाशिव गंगाराव भोरे कलामंदिराचे लोकार्पण उपमुख्यमंत्री देवेंद फडणवीस यांच्या हस्ते पार पडले. यावेळी पालकमंत्री दादाजी भुसे, ग्रामविकास व पर्यटन मंत्री गिरीश महाजन, आमदार राहुल ढिकले, सीमा हिरे, देवयानी फरांदे, महानगरपालिका आयुक्त अशोक करंजकर, माजी आमदार बाळासाहेब सानप, माजी नगरसेविका प्रियंका माने, पूनम मोगरे, रूची कुंभारकर, मच्छिंद्र सानप यांच्यासह अधिकारी व नागरिक मोठ्या संख्यने उपस्थित होते. उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते फित कापून व कोनशिला अनावरण करून कलामंदिराचे लोकार्पण करण्यात आले. हिरावाडी परिसरात महापालिकेच्या ६ एकर जागेत या २९०० चौरस मीटरचे बांधकाम करुन हे कलामंदिर साकारले आहे. या नाट्यगृहात अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. नाट्यगृहाच्या पश्चिम बाजूस वाहनतळाची प्रशस्त व्यवस्था करण्यात आली आहे. दोन्ही बाजूंना प्रसाधनगृहांची व्यवस्था, कलाकरांना तालीम करण्यासाठी दोन्ही मजल्यांवर स्वतंत्र दोन हॉल, भव्य रंगमंच व सुसज्ज मेकअप रूमही आहे. नाट्यगृहात भव्य प्रकाशयोजना, ध्वनीयोजना, स्वयंचलित सरकते पडदे यासह बाल्कनीत १५० आणि खाली ५०० अशा एकूण ६५० आरामदायी आसनव्यवस्था करण्यात आली आहे.

## अवैध जुगारावर छापेमारी, ५५ व्यक्ती विरोधात ३ गुन्हे दाखल, ५ लाख ८६ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त !

अहमदपूर : उपविभागीय पोलीस अधिकारी चाकूर तथा सहाय्यक पोलीस अधीक्षक बी.चंद्रकांत रेड्डी यांनी त्यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारावर अहमदपूर शहरातील वेगवेगळ्या ठिकाणी चालणाऱ्या मटका जूगारावर एकाच वेळी विविध पथके तयार करून कारवाई करण्यात आली आहे. दिनांक ०९/०२/२०२४ रोजी अहमदपूर येथे वेगवेगळ्या ठिकाणी पत्र्याच्या शेडमध्ये, तसेच रूम मध्ये काही इसम मटका कल्याण ,मिलन डे, टाईम बाजार नावाचा जुगार खेळत आहेत. अशी मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारावर उपविभागीय पोलीस अधिकारी चाकूर यांनी अहमदपूर येथील मटन मार्केट परिसर, भीम नगर, गौरीशंकर बेंबळे यांचे राहते घरामध्ये अशा तीन ठिकाणी छापेमारी करून बेकायेशीररित्या मटका जुगार खेळत व खेळवीत असताना मिळून आल्याने इसमावर कार्यवाही करत त्यांच्याकडून रोख रक्कम व जुगाराचे साहित्य असा एकूण ५ लाख ८६ हजार ४०० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस ठाणे अहमदपूर मध्ये खालील नमूद इसमाविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम १८८७ चा कलम १२(अ), ४, ५ कायद्यान्वये प्रमाणे ३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. १) जगदीश रामलाल मंडले, वय ४९ वर्ष रावळी, अहमदपुर २) रतन मदनलाल बरेटीय, वय ३० वर्ष रा काहळेगाव रोड, अहमदपुर ३) छोटुलाल हिरामण भगत, वय ४९ वर्ष रा. चौडा नगर अहमदपुर ४) इंद्रजीत हनुमान राऊते वय ४९ वर्ष रा. गवळी गाली अहमदपुर. ५) मिलकांत गोपाळ काबलीया वय ३४ वर्ष रा. महात्मा फुले रोड, अहमदपुर. ६) रमेश सिताराम भगत बय ३२ वर्ष रा. गवळी गली अहमदपुर. ७) मनिष कालीदारा मदनेवार वय ४४ वर्ष रा. ब्राम्हण गली अहमदपुर. ८) योगीराज आर्जुन मंडले वय ४४ वर्ष रा. गवळी गल्ली अहमदपुर. ९) सुरज राऊत्रे,रा. अहमदपुर (फरार) १०) धरम काबली ,रा. अहमदपुर (फरार) ११) राजेश भगत, रा. अहमदपुर (फरार) १२) गणेश बरेटीया, रा. अहमदपुर (फरार) १३) शुभम राउले, रा. अहमदपुर (फरार) १४) विशाल मंडले, रा. अहमदपुर (फरार) १५) नितु राउले, **(पान २ वर)...**

## सामान्य माणसाला भयमुक्त वाटावे असे काम करा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**नाशिक,(जिमाका):सद्रक्षणाय निग्रहणाय हे महाराष्ट्र पोलिसांचे ब्रीदवाक्य आहे. या ब्रीदवाक्याप्रमाणे महाराष्ट्र पोलीस सदैव नागरिकांचे रक्षण करण्यास व दुर्जनांवर नियंत्रण ठेवून त्यांचा नायनाट करण्यास कटिबद्ध आहे. या उक्तीप्रमाणेच सामान्य माणसाला भयमुक्त व सुरक्षितेचे ठिकाण वाटेल यादृष्टीने काम करावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.**

शहरातील सातपूर पोलीस ठाण्याच्या नवीन इमारतीच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री दादाजी भुसे, पर्यटन व ग्रामविकास मंत्री गिरीष महाजन, आमदार सीमा हिरे, पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, उपायुक्त मोनिका राऊत, किरण कुमार चव्हाण, प्रशांत बच्छाव, चंद्रकांत खांडवी यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

यावेळी उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी कोनशिला अनावरण करून नूतन इमारतीचे उद्घाटन केले. ते म्हणाले की, या नूतन इमारतीत अद्ययावत यंत्रणा व



सेवा- सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. सीसीटीएनएस प्रणालीच्या माध्यमातून सर्व पोलीस ठाणी एकमेकांशी जोडली जाणार आहेत. पोलीस स्टेनशच्या सुंदर इमारतीसारखचे येथील अधिकारी व कर्मचारी निश्चितच उत्तम काम करतील, असा विश्वास उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.

आमदार सीमा हिरे यांच्या आमदार निधीतून ५ कोटींच्या निधीतून साकारलेल्या सातपूर पोलीस ठाण्याच्या नवीन इमारतीचा उद्घाटन समारंभ पार पडला. या इमारतीमध्ये सुसज्ज अत्याधुनिक दर्जाच्या सोयीसुविधा आहेत. वरिष्ठ निरीक्षकांसह अधिकारी वर्गासाठी स्वतंत्र दालन, अंमलदार व तक्रारदारांसठीची स्वतंत्र दालन आहे. इमारत ही दुमजली असल्याने पोलिसांच्या कामाकाजाच्या दृष्टीकोनातून विभागवार सोयी उपलब्ध केलेल्या आहेत. यावेळी आमदार सीमा हिरे यांनी मनोगत व्यक्त केले.

## शिक्षणातील गौरवशाली परंपरा टिकविण्याचे काम जेएसपीएमच्या अराईज इंटरनॅशनल स्कूलने करावे - उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार

पुणे : समाजातील प्रत्येक घटकाला शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी १९८३ मध्ये कव्हा या गावी कव्हेकरांनी जेएसपीएम संस्थेची स्थापना करण्यात आली. या संस्थेच्या माध्यमातून लातूर, रेणापूर, छत्रपती संभाजीनगर, पुणे अशा विविध ठिकाणी ३५ युनिट, १५०० कर्मचारी यांच्या माध्यमातून १५००० विद्यार्थ्यांना सुसंस्कृतपणे घडविण्याचे काम केले जात आहे. पुण्यातही भोसरीनंतर रावेतमध्ये अराईट इंटरनॅशनल स्कूलच्या माध्यमातून आणखी एका युनिटची भर पाडण्यात आली असून कव्हेकर साहेबांचे काम त्यांना मिळणारी प्रतिभाताईंची साथ व याबरोबरच अजित, रंजीत व आदिती, काजल यांचेही योगदान मोलाचे लाभत असल्यामुळे जेएसपीएम या छोट्याशा रोपट्याचे आज वटवृक्षात रूपांतर झालेले आहे. त्यामुळे शिक्षणातील गौरवशाली परंपरा टिकविण्याचे काम जेएसपीएमच्या अराईज इंटरनॅशनल स्कूलने करावे असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांनी केले.

यावेळी ते जेएसपीएम संस्थेच्या वतीने रावेत पिंपरी चिंचवड पुणे येथील अराईज इंटरनॅशनल स्कूलच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. यावेळी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर हे उपस्थित होते



तर प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री ना.संजयजी बनसोडे, भोसरी मतदार संघाचे माजी आमदार विलास लांडे, पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती दिलीप काळभोर, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माजी महापौर दत्तात्रय धनकवडे, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माजी नगरसेवक मोरेश्वर भोंडवे, चाकूर नगरपंचायतीचे नगराध्यक्ष कपील माकणे, भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश महामंत्री अनुप मोरे, लातूर जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ.प्रतिभाताई शिवाजीराव पाटील कव्हेकर, भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष अजितसिंह पाटील कव्हेकर, कार्यकारी संचालक रंजितसिंह पाटील कव्हेकर, संजय वाबळे, अरून पवार, नाना काटे, राजू मिसाळ, आय.ए.एस.अधिकारी दिनकर जगदाळे, प्राचार्य कनिका आनंद आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना उपमुख्यमंत्री अजितदादा पवार म्हणाले की, १९९५ ते १९९९ या कालावधीत माजी आ.कव्हेकर साहेबांनी विधीमंडळामध्ये माझ्यासोबत काम केलेले आहे. तेव्हापासून राजकीय क्षेत्राबरोबरच शैक्षणिक व सहकार क्षेत्रामध्येही त्यांनी चांगल्या पध्दतीने काम सुरू केलेले आहे. या संस्थेला आज चाळीस वर्ष पूर्ण होत आहेत. समाजाच्या जडणघडणीमध्ये शिक्षणाला पर्याय नाही. चांगल्या शाळा, शिक्षक, शिक्षण संस्था, **(पान ३ वर)...**

## मुली मुलांसाठी स्वतंत्र क्रीडा आश्रमशाळांची निर्मिती करणार मंत्री डॉ. विजयकुमार गावित

नंदुरबार, (जिमाका) राज्यातील सर्व आदिवासी शासकीय आश्रमशाळांमध्ये भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र आणि गणित विषयांच्या स्वतंत्र लॅब निर्माण केल्या जाणार असून येणाऱ्या काळात प्रत्येक



आदिवासी विकास प्रकल्प क्षेत्रात मुले व मुलींसाठी स्वतंत्र क्रीडा आश्रमशाळा निर्माण केल्या जातील, असे प्रतिपादन राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित यांनी केले.

आदिवासी विकास विभागाच्या वतीने लोभाणी (ता.तळोदा) येथील मुलींच्या आश्रम शाळेच्या इमारत उद्घाटन प्रसंगी मंत्री डॉ. गावित बोलत होते. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष डॉ. सुप्रिया गावित, जि.प.सदस्य श्री. वळवी, सरपंच जयश्री पावरा, वसंत वळवी, नवलसिंग वळवी, शिवाजी पराडके, मुकेश वळवी, तळोदा एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे सहाय्यक प्रकल्प अधिकारी श्री.राऊत, श्री. कोकणी शिक्षक, विद्यार्थी, पालक व पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मंत्री डॉ. गावित म्हणाले की, राज्यातील सर्व शासकीय आश्रमशाळा सर्व सुविधांनी युक्त स्वमालकीच्यी शासकीय इमारतीत आणल्या जात आहेत. त्यात तळोदा प्रकल्पातील ९८ टक्के इमारतींचे काम पूर्ण झाले असून उर्वरीत २ टक्के इमारती येत्या जून महिन्याच्या आत पूर्णत्वास येतील. तसेच या आश्रमशाळांना जोडून मुला, मुलींची स्वतंत्र वसतिगृहेही निर्माण केली जात आहेत. येत्या काळात दुर्गम भागातील आश्रमशाळांना जोडून शिक्षक, कर्मचाऱ्यांची स्वतंत्र निवास्थाने तयार करण्याचा शासनाचा मानस असून त्यामुळे शिक्षकांचे २४ तास मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभणार आहे. ज्या क्षेत्रात विद्यार्थ्यांना करियर करावेसे वाटते त्या क्षेत्रात त्यांनी करिअर करण्याची संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे. दर तीन महिन्यांनी मुलांची परीक्षा घेऊन त्यांच्या आकलन व व गुणवत्तेनुसार तज्ज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन त्यांना प्रत्यक्ष अथवा व्हर्चुअल क्लासरूमच्या माध्यमातून उपलब्ध करून दिले जाणार आहे.

## मोदी सरकारच्या काळात देशाच्या अर्थव्यवस्थेची विक्रमी घोडदौड भाजपा प्रदेश सह मुख्य प्रवक्ते विश्वास पाठक यांचे प्रतिपादन

**मुंबई : मोदी सरकारच्या कार्यकाळात आर्थिक क्षेत्रात अनेक धोरणात्मक निर्णय घेतल्यामुळे देशाची विक्रमी वेगाने प्रगती झाली आहे असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सह मुख्य प्रवक्ते विश्वास पाठक यांनी शनिवारी केले. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत श्री.पाठक बोलत होते. प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, प्रदेश प्रवक्ते ओमप्रकाश चौहान यावेळी उपस्थित होते. यूपीए सरकारच्या काळातील आर्थिक गैरव्यवहार आणि ढिसाळ,भ्रष्ट कारभाराचे काळे वास्तव जनतेसमोर ठेवणे गरजेचे होते म्हणूनच केंद्र सरकारने संसदेत श्वेतपत्रिका सादर केली असल्याचे श्री. पाठक यांनी नमूद केले.**

श्री. पाठक यांनी यावेळी, २००४ ते २०१४ या यूपीए सरकारने देशाची अर्थव्यवस्था अस्थिर, कमकुवत करत देश कसा रसातळाला नेला याचा लेखाजोखा सादर केला. २०१४ मध्ये मोदी सरकार सत्तेत आल्यानंतर असंख्य आव्हाने सरकारसमोर होती मात्र या आव्हानांचा प्रभावीपणे सामना करत,चोख आर्थिक नियोजन व योजनांच्या माध्यमातून भारतीय अर्थव्यवस्था जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनली आहे. नजीकच्या काळात आपली अर्थव्यवस्था तिस-या स्थानावर झेप घेईल असा




विश्वास श्री. पाठक यांनी व्यक्त केला.

यूपीए आणि एनडीए सरकारच्या १० वर्षांच्या कार्यकाळातील अर्थव्यवस्थेचे तसेच वीज,पाणी, गॅस,शैक्षणिक सुविधा आदी क्षेत्रातील कामगिरीची तुलनात्मक आकडेवारी मांडत श्री. पाठक यांनी यूपीए सरकारच्या गैरकारभारावर ताशेरे ओढले. ते म्हणाले की यूपीएच्या काळात भारताचा सरासरी महागाईचा दर तब्बल ८.२ % वर पोहोचला होता त्यामुळे सामान्य जनतेला सतत १० वर्षे महागाईची झळ सोसावी लागली, परंतु मोदी सरकारने गेल्या दहा वर्षात अर्थव्यवस्थेमध्ये मूलभूत बदल करून महागाईचा दर ५ टक्क्यांपर्यंत खाली आणण्यात यश मिळवलं आहे. कोविड संकट येऊनही भारताची अर्थव्यवस्था वेगाने प्रगती करत आहे. अंत्योदयाची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी आखलेल्या योजनांमुळे २५ कोटी जनता दारिद्र्यरेषेच्या वर आली आहे.

यूपीए सरकारच्या काळात मंत्र्यांच्या निकटवर्तियांना कर्जे देण्यासाठी हस्तक्षेप होत असल्याने बँकांच्या बुडीत कर्जामध्ये अव्वाच्या सव्वा वाढ होऊन, पूर्ण बँकिंग यंत्रणा डबघाईला आली होती. मोदी सरकारच्या बँकिंग धोरणामुळे अनेक बँका कार्यक्षम होऊन देशाला विकसित भारत बनवण्यासाठी महत्वाची भूमिका बजावत आहेत. यूपीए च्या काळात संपूर्ण देशात केवळ १४ कोटी गॅस कनेक्शन्स होती. आता मोदी सरकारच्या उज्वला योजनेच्या माध्यमातून केवळ १० वर्षांत तो आकडा ३१ कोटींच्याही पुढे गेला आहे. यूपीए काळात ग्रामीण भारतात मोठ्या प्रमाणावर विद्युतीकरण करण्यात अपयश आले. एनडीए काळात मात्र १००% विद्युतीकरण करण्यात आले. यूपीए काळात जिथे देशात सरासरी १२ तास वीज मिळायची तिथे आज एनडीए काळात २०.६ तास वीज मिळते.२०१४ मध्ये ग्रामीण भागात केवळ ३ कोटी घरांमध्ये स्वच्छ पाण्याचे नळ होते. मोदी सरकारच्या १० वर्षाच्या कार्यकाळात जलजीवन मिशनच्या अंतर्गत तो आकडा तब्बल १३.८ कोटींच्याही पुढे गेला आहे. डीबीटीच्या माध्यमातून यूपीए सरकारच्या काळात केवळ १० कोटी लाभार्थी होते तिथे आज मोदी सरकारच्या काळात वेगवेगळ्या ३१० योजनांचे तब्बल १६६ कोटी लाभार्थी आहेत. त्यामुळे गेल्या १० वर्षांत २५ कोटींहून अधिक लोक गरिबीतून मुक्त झाले आहेत. यूपीए सरकारच्या काळात देशात मोबाईल इंटरनेट वापरकर्त्यांची संख्या ६ कोटी होती ती आज ९० कोटींहून अधिक आहे. आज गावागावात हाय स्पीड ५ॠ इंटरनेट सेवा परवडणाऱ्या दरात उपलब्ध आहे.

मोदी सरकारने कार्यकाळात शैक्षणिक क्षेत्रात आमूलाग्र बदल करत प्रगती साध्य केल्याचे सांगत श्री. पाठक म्हणाले की, यूपीए काळात मेडिकल कॉलेजेसची संख्या केवळ ३८७ होती, आता मोदी सरकारच्या काळात ही संख्या ७०६ वर गेली आहे. यूपीए सरकारच्या काळात देशात एकूण ५१ हजार जागा वैद्यकीय शिक्षणासाठी उपलब्ध होत्या तर मोदी सरकारच्या कालावधीत ही संख्या तब्बल १ लाखाच्या वर गेली आहे. आज देशात ११६८ विद्यापीठे आहेत जी यूपीए सरकारच्या काळात केवळ ६७६ होती.

पायाभूत सुविधा बळकटीकरणाकडे मोदी सरकारने मोठे प्राधान्य दिल्याचे श्री. पाठक म्हणाले.देशातील २० शहरांत मेट्रो आहेत मात्र यूपीए च्या काळात ही संख्या केवळ ५ होती. देशात दिवसाला सुमारे २८ किमी इतक्या प्रचंड वेगाने नवीन रस्ते बांधून होत आहेत. यूपीए सरकारच्या काळात ही संख्या केवळ १२ किलोमीटर इतकी होती. मागील १० वर्षांमध्ये देशात ५४ हजार किमी लांबीचे महामार्ग बांधून झाले आहेत. यूपीए सरकारच्या काळात ही संख्या केवळ २५ हजार किलोमीटर होती. देशात कार्यरत असणाऱ्या विमानतळांची संख्या यूपीए च्या काळातील ७४ वरून १४९ वर पोहोचली आहे. यूपीए सरकारच्या काळातील ७.६ बिलियन डॉलर निर्यातीचा आकडा आज २२.७ बिलियन डॉलर अशा विक्रमी पातळीवर पोहोचला आहे. आज तब्बल १ लाख १७ हजाराहून अधिक स्टार्टअप देशभरात नोंदवले गेले आहेत याउलट यूपीए सरकारच्या काळात केवळ ३५० स्टार्टअप देशात होते. एकूणच गेल्या १० वर्षांत मोदी सरकारने देशाचा चौफेर विकास साधल्याचेही श्री.पाठक यांनी सांगितले.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.com

## झरोका

एक – ओबीसी आणि मराठा कुणबी आरक्षण, जात प्रमाणपत्रे वगैरे वाद मिटला नसतानाच राज्य सरकारने चक्क ब्राह्मणासाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापण्याचा निर्णय जाहीर करून त्यासाठीचा निधी ही ओबीसी मंत्रालयातून दिला जाणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी स्पष्ट केल्याने, धर्मनिरपेक्ष, पुरवगामी महाराष्ट्रात हे काय चाललेले आहे हेच कळत नाही. डोकं बधीर झालय.

दुसरा – अरे, विद्यमान सरकार हे लोकहिताचे नसून केवळ जाती, जाती समाजात तेढ निर्माण करून, कायदा व सुव्यवस्थेचे वाभाडे काढणारे सरकार आहे. समाजात संघर्ष निर्माण करून शिंदे, फडणवीस, पवार हे काय कार्यकाळ पूर्ण करुपाहत आहेत, दुसरं काय.

एक – अहो, ओबीसी समाज आरक्षणाचा विषय ऐरणीवर आहे. जरांगे पाटील, छगन भुजबळ दंड थोपटून उभे आहेतच. त्यात ब्राह्मणांना पुढे करून त्यात आगीत तेल ओतण्यासारखेच आहे. अशक्य ते निर्णय जाहीर करून जनतेला वेठीस धरण्याचे असले सरकारी चाळे बंद केले पाहिजे. त्यासाठी आवाज उठविला पाहिजे. त्याशिवाय पर्याय नाही.

दुसरा – अरे, सरकारलाच समाजहित, सामाजिक ऐक्य, कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवायचे नसेल तर, तुम्ही, आम्ही रस्त्यावर येऊन काय फायदा. शांत रहा, डोक्याला ताण देऊ नकोस.

एक – अहो, सरकार म्हणजे काही निर्जीव वस्तू नाही तीही माणसंच, लोकप्रतिनिधी आहेत. निर्णयाची अंमलबजावणी झाली, केली पाहिजे. घोषणा करून, ग्वाही देऊन सर्व सामान्याचे दिशाभूल करणे केंद्र सरकारला शोभते. महाराष्ट्र सरकारला अजिबात नाही. महाराष्ट्र फुले, शाहू, आंबेडकरांचा आहे. तिथं बावळटपणा जमत नाही हे ठासून सांगितले पाहिजे लक्षात ठेवा.

दुसरा – अरे, कुणबी तळ्यात ना मळ्यात पण छत्रपती शिवाजी महाराज यांची शपथ घेऊन मराठ्यांना झूलवून स्वतःची खुर्ची मजबूत करायला मुख्यमंत्री शिंदे आहेत ना. मंग ब्राह्मणाचे काय घेऊन बसलास ते तर चेहऱ्याला बघूनच थंड पडतील.

# मनमानीसाठी न्याय संस्थेची गरज कशाला ?

भारत माझा देश आहे, कधी कधी भारत माझा देश होता. तो आजही आहेच, पण याच लोकशाही भारतात मनमानी कारभार, सत्ताकारण, करण्यासाठी न्यायिक व्यवस्थेतील समूहालाच गुलाम बनून कोणी सत्तापीपासून, सत्ताधीश बनण्यासाठी मनमानी कारभार सत्ताकारण करून धर्मादाय आयुक्त निवडणूक आयोगासारख्या न्याय संस्थांनाच पुढे करून राजसत्तेचे मांडलिकत्व सिद्ध करू पाहत असेल तर ती व्यक्ती माणूस या सदनेत बसूच शकत नाही अशीच प्रतिक्रिया राजकीय वर्तुळातून प्रकट होताना दिसते आहे. ती अवास्तव नसावी असे वाटते.

गेली दहा वर्ष न्याय संस्था न्याय कारभार, न्यायिक प्रशासन या सर्व बाबी मनमानी, कृती, वृत्तीने जखडून ठेवल्याची चर्चा होताना दिसते आहे. कारण वस्तुस्थिती परिस्थिती आणि वास्तव बाजूला ठेवून सर्व काही निर्णय घेतले जात असताना दिसतात असेच वास्तव कुजबज सामाजिक, राजकीय, शासकीय, प्रशासकीय, वर्तुळासह न्यायवृंद क्षेत्रातील होताना दिसते आहे. हे वास्तव नाकारून चालणार नाही. असाच सूर सर्वसामान्य जनतेतून आवळला जाताना दिसतो आहे. तो अव्हेरण्यासारखा नसावा असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

वारिकाच्या उकर्डा उकरून त्यात काय मिळणार आहे तो सारं काही पोटासाठीच करतो केस निर्मूलन करणे हाच त्याचा एकमेव उद्योग असतो. त्याच धर्तीवर डोंबारी हेही पोटासाठी नाचतात, नाचवितात पण आज सहजपणे बोलून जातो की ही डोंबारी सारखे वागते, हा काय डोंबऱ्याचा खेळ नव्हे, गप बस म्हणून सहज म्हणतो. त्यावर ते लाज, लज्जा ओळखून शांत बसतील पण आजचे राजकारण, सत्ताकारण हे एवढे

## संपादकीय...

विचित्र होऊन बसले आहे की, तत्कालीन कामाठीपुराही लाजून मान खाली घातला असता म्हणूनच तत्काली राजकीय परिस्थितीचे विवेचन करताना विख्यात कवी नामदेव ढसाळ यांनीच राजकारणी, सत्ताकारणांना तुझी यत्ता कंची अर्थात तुझी लायकी काय हा असा गर्भित प्रश्न विचारला होता. पण आज घडीला तसा प्रश्न, सवाल विचारणारा कवी साहित्यिक, राजकारणी नसल्यानेच हा मनमानी न्याय संस्थेचा कारभार कोणीतरी हकतो आहे हेच स्पष्ट होते ते अदृश्य व्यक्तीच आहे. असा मतप्रवाह समोर येताना दिसतो आहे. तो केवळ आवाज उठविला, जाब विचारला तर पुढे काय ते वाढून ठेवलेले असल्याने येरे दसकटा... कशाला म्हणून सारेच मनमानी भूत मानगुटीवर बसते आहे त्याचे काय.

भारतीय सत्ताकारण हे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याच इशाऱ्यावर चालते त्यांना विरोध करणे, प्रश्न विचारणे किंवा असे तसे का म्हणणे अजिबात परवडत नाही. शासकीय यंत्रणेच्या माध्यमातून ते जनतेला चक टाळकुठे बनवून सोडलेले आहे. उठा, बसा, जगा, मरा यापेक्षा दुसर काहीच बोलू नका. बोलल्यास ईडी, सीबीआय वगैरे यंत्रणा आहेतच हे त्यांचे भारत महासत्ता बनविण्याचे धोरण असल्याने मनमानी कारभारासाठी न्याय संस्थेची गरजच काय हेच स्पष्ट होते अशी मनोभावना निर्माण झाली असेल तर त्यात जनतेची काय चूक ठरते असा बोलवायला होतो आहे.

महाराष्ट्राच्या सत्ताकारणात विधानसभा अध्यक्षांनी शिंदे, ठाकरे प्रकरणात काय निकाल दिला, पात्र–अपात्रेवर काय निकाल दिला, राष्ट्रवादीच्या पात्र, अपात्रतेवर काय झाले आहे हे कळेलच पण राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार यांचा की अजित पवार यांचा निकाल निवडणूक आयोगाने दिला तो निकालच शालेय विद्यार्थीही मान्य करीत नाही. पण त्यात निवडणूक आयोगाचा निकाल हाच तृतीयपंथीच्या असावा अशी जी ओरड होते आहे, त्याचे निराकरण कोण करणार हा प्रश्न अनुत्तीरच राहतो आहे त्याचे काय मग मनमानी कारभार करायचाच असेल तर न्याय संस्था, धर्मदाय आयुक्त, निवडणूक आयोग कशाला असे म्हटल्यास वावगे ठरू नये असे वाटते.

लोकप्रतिनिधी हा मतदान प्रक्रियेतूनच निवडणूक आयोग, अधिकारी जाहीर करतो. लोकप्रतिनिधीच मुख्यमंत्री प्रधानमंत्री वगैरे ची नियुक्ती करतात. सेवाभावी संस्था, सामाजिक संघटना, राजकीय पक्ष ही लोकसमहातूनच स्थापल्या जातात, राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक कोण आहेत, त्यातील नेते, कधी केव्हापासून आहेत हे जनताच नव्हे तर निवडणूक आयोगाच्या आयुक्तासह त्यांच्या कुटुंबीयांना माहित असेल पण सत्तेचे गुलाम बनलेल्या व्यक्ती न्यायप्रक्रियेतील अधिकारीच दलाल भाड–भिड खाऊ असतील तर न्यायिक कायदे धोरण किती चांगले असले तरी अशा नासक्या कृतीवर तिचे लोकांमुळे हसू होते. मग मनमानीसाठी न्याय संस्थेची गरजच काय हे समोर येते एवढेच

# तृणधान्य नियमित आहारात, आरोग्य नांदेल घराघरात

पौष्टिक तृणधान्य हे आपले पारंपरिक, पोषणयुक्त, पौष्टिक, आरोग्यदायी अन्न असून त्याचा दिवसेंदिवस आहारातील वापर कमी होत आहे. त्यामुळे आपल्याला विविध आजारांचा सामना आपल्याला करावा लागत आहे. बदलत्या जीवनशैलीत आहाराकडे होत असलेले दुर्लक्ष आणि त्यामुळे उद्भवणाऱ्या आजारावर मात करण्याकरीता ज्वारी, बाजरी, नाचणी, राळा, वरई, कोदो, कुटकी, सावा, राजगिरा यासारखी पौष्टिक तृणधान्यांचा आहारात समावेश करण्याची गरज भासत आहे.

**आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष**

भारत सरकारने वर्ष २०१८ हे राष्ट्रीय तृणधान्य वर्ष म्हणून साजरे केले. यावर्षीपासून त्यांना पोषक धान्य किंवा पोषक तृणधान्ये म्हटले जात आहे. संयुक्त राष्ट्र संघाने २०२३ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष' म्हणून घोषित केले असून याअनुषंगाने राज्यात १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ या कालावधीत पौष्टिक तृणधान्याची उत्पादन वाढ, तंत्रज्ञान प्रसार, मूल्यसाखळी विकास आदीसाठी 'महाराष्ट्र श्री अन्न अभियान' राबविण्यात येत आहे.

**मिलेट ऑफ मंथ'संकल्पना**

'आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष'अंतर्गत 'मिलेट ऑफ मंथ' या संकल्पनेनुसार जानेवारी महिना बाजरी, फेब्रुवारी महिना ज्वारी, ऑगस्ट महिना राजगिरा, सप्टेंबर राळा, ऑक्टोबर वरई आणि डिसेंबर महिना नाचणी म्हणून साजरा करण्यात येत आहे. या उपक्रमाअंतर्गत राज्यात विविध कार्यक्रमाचे आयोजन करुन तृणधान्यांचे महत्व तसेच आहारात समावेश करण्याबाबत प्रोत्साहित करण्यात आले आहे.

**ज्वारी (सोरगम मिलेट्स)**

ज्वारी हे तृणधान्य असून ते ग्लुटेनमुक्त व मोठ्या प्रमाणात तंतुमय पदार्थ असणारे धान्य आहे. प्रथिने, थायमिन, नियासिन व जीवनसत्व बी–६ यांचा चांगला स्त्रोत आहे. ज्यांना ग्लुटेनचा त्रास होतो किंवा ज्यांना लहान आतड्याचा विकार आहे, अशा लोकांसाठी ज्वारी हा एक चांगला पर्याय आहे. ज्वारी हा अँटीऑक्सिडंटस घटकांचा एक चांगला स्त्रोतदेखील असून त्यामुळे कर्करोग व इतर रोगांपासून संरक्षण होण्यास मदत होऊ शकते. ज्वारीमध्ये मॅग्नेशियम, पोटॅशियम व जस्त या खनिजे अधिक प्रमाणात असतात.

**बाजरी (पर्ल्स मिलेट्स)**

बाजरी पचण्यास हलक्या तंतुमय घटकांनीयुक्त असल्यामुळे त्यास 'सर्वोत्तम अन्नपदार्थ' असे म्हणतात. वजन कमी करणे, रक्तातील मेदाचे प्रमाण कमी करण्यास मदत करते. बाजरीत कॅल्शियम, मॅग्नेशियम व लोह यांसारख्या खनिजांनी संपन्न असल्यामुळे एकूणच आरोग्य सुधारण्याच्यादृष्टीने ती अत्यंत उपयुक्त आहे.

बाजरी हा फॉस्फरससमृद्ध स्त्रोत असून शरीरातील पेशी संरचनेतील तो एक महत्वाचा भाग आहे. मधुमेह नियंत्रित करण्यासाठी अत्यंत प्रभावी आहे. अधिक तंतुमयतेमुळे बाजरीचे पचन मंदगतीने होते. अन्य अन्नपदार्थांच्या तुलनेत कमी वेगाने रक्तात शर्करा सोडण्याचे काम करते. बाजरी हृदयाचे आरोग्य राखण्याच्यादृष्टीने महत्वाची भूमिका पार पाडते. आरोग्याच्या दृष्टीने अनावश्यक परिणाम कमी करण्याचे घटक असल्यामुळे हृदयविकाराचा धोका टाळण्यास मदत होते.

**सावा (लिटल मिलेट्स)**

लघु तृणधान्य हे छोटे, गोल व लालसर करड्या रंगाचे असते. त्यांना कुटकी, काब्बु आणि पोन्नी असे म्हटले जाते. ती मॅग्नेशियम, पोटॅशियम, जस्त व लोह याचा समावेश असलेल्या खनिज पदार्थांचा उत्तम स्त्रोत आहे. मॅग्नेशियम हृदयाचे आरोग्य वाढवते तर फॉस्फरस हे वजन कमी करण्याचे ऊतीची भरपाई करण्याचे व ऊर्जा निर्मितीचे कार्य करते. लघु तृणधान्य हे पाचक तंतुमय पदार्थ व जीवनसत्व बी–१, बी–२ व बी–६ यांच्यासारख्या जीवनसत्वांचा उत्तम स्त्रोत आहेत. त्यामध्ये मेद व कॅलरीज प्रमाण कमी आहेत.

आगामी काळात निरोगी आयुष्य जगण्यासाठी आहारात तृणधान्याचे महत्व अधिक प्रमाणात वाढणार आहे. त्यामुळे प्रत्येकांनी आपल्या आहारात तृणधान्यांचा अधिकाधिक समावेश करुन शेतकऱ्याला आर्थिकदृष्या सक्षम करण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. (क्रमशः)

**संकलन : जिल्हा माहिती कार्यालय, पुणे**

## अवैध जुगारावर छापेमारी,...

**(पान १ वरुन) :** रा. अहमदपुर (फरार) १६) सोनु राउले , रा. अहमदपुर (फरार) १७) देवा भगत , रा. अहमदपुर (फरार) १८) श्याम गोपाल यादव/काबलीये , रा. अहमदपुर (फरार) १९) खयुम पठाण, रा. अहमदपुर (फरार) २०) रुपेश कांबळे , रा. अहमदपुर (फरार) २१) विशाल डावरे , रा. अहमदपुर (फरार) २२) शबदर लष्करे , रा. अहमदपुर (फरार) २३) रियाज पटेल रा. अहमदपुर (फरार) २४) व्यंकट बुजारे रा ढाळेगाव, अहमदपुर (फरार) २५) जगू फड रा. धर्मापुरी (फरार) २६) गौरीशंकर मारोतीराव बेंबळे, वय ५२ वर्ष रा. बालाजी मंदीराचे पाठीमागे अहमदपुर. २७) चांदपाशा महेबुबसाब शेख, वय ४८ वर्षे रा. महसूल कॉलनी अहमदपूर. २८) दत्तालय सिताराम वाघमारे, वय ३८ वर्षे, आण्णाभाऊ साठे नगर अहमदपूर. २९)जयसिंग पांडूरण शेळके, वय ६५ वर्षे रा. इंदिरानगर अहमदपूर. ३०) किवान भिकाजी जंगले ,वय ६० वर्षे रा. पंचशिल नगर अहमदपूर. ३१) राम गंगाराम जाधव ,६० वर्ष रा तिपक्षा नगर, अहमदपूर ३२) विजय सुर्यकांत पवार, वय ४२ वर्षे, रा. तिपन्ना नगर आमदपूर. ३३) हिरालाल धर्मराज काबाली, वय ३३ वर्षे, राहणार वेताळगली अहमदपूर. ३४) अंकुश काशीनाथ आया दांडगे, यय ४३ वर्ष रा. अहमदपुर. ३५) शेख खदीर गनीसाब, वय ३८ वर्ष, रा. अहमदपुर. ३६) दिलीप राम गायकवाड ,वय ४४ वर्ष ना. साठेनगर अहमदपुर . ३७) शेख करीम गफुरसाब वय ५५ वर्ष रा हाळणी ता. अहमदपुर. ३८) गणेश तुळजाराम बटावाले. वय ४१ वर्ष रा. महादेव सम्बी अहमदपुर. ३९) मधुकर माधवराव शिंदे, वय ४५ वर्ष रा. काजळहिप्परगा ता. अहमदपुर. ४०) जुबेर अहमदखी पठाण,वय ३३ वर्ष रा. मॉंदा रोड अहमदपुर. ४१) गौतम गोरोबा, वय ३९ गायकवाड भीम नगर, अहमदपुर. ४२) धनाजी सुदाम बेले, वय ४१ वर्ष ना. रोकडा सावरगाव. ४३) सुरेश तालेराव वाघमारे, वय ३० वर्ष, रा. अहमदपुर. ४४) बालाजी बळीराम सन्मुखराव , वय ४० वर्ष दोघे रा. अहमदपुर. ४५) जनार्धन नागनाथ कौटंबे वय ३५ वर्षे रा. रोकड़ा सायरगाव,अहमदपुर. ४६) गजानन शिवकांत कावळे वय ३५ वर्ष रा. रोकडा सावरगाव. अहमदपुर. ४७) संजय गंगाराम शेधर, वय ३० वर्ष रा. महात्मा फुले सोसायटी कंधार. ४८) बालाजी प्रकाश मुळे वय २५ वर्ष रा.माकणी ४९) बालाजी निवृत्त शिंदे, वय ३८ वर्ष रा. साठे मगर, अहमदपुर. ५०) वैजनाथ श्रीराम केंद्रे वय ३४ वर्ष रा. लांज्री. ५१) भिमराव विठठलराव आचार्य वय ६७ वर्ष रा. परचंडा. ५२) शुभाष मानिक बाबर, वय २८ वर्ष रा. हाळदव ता. लोहा ५३) लक्ष्मण जळबा पेडनपाड वय २७ वर्ष रा. चारटागी, अहमदपुर ५४) निजाम इसाक शेख वय ५० वर्ष रा. देशमुखवाड, अहमदपुर. ५५) राजु बालाजी पाटील यय ५२ वर्ष रा. पाटील गल्ली, अहमदपुर असे असून वरील आरोपी मटका नावाचा जुगार खेळत असताना मिळून आलेले आहेत. तसेच पोलिसांची चाहूल लागतात पळून गेलेल्या फरार आरोपींचा शोध सुरू आहे. पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे यांच्या आदेशावरून जिल्ह्यात अवैध व्यवसाय करणाऱ्यावर मोठ्या प्रमाणावर धाडी मारुन कार्यवाही करण्याचे सत्र सुरू आहे. याचाच एक भाग म्हणून दिनांक ०९/०२/२०२४ रोजी पोलीस ठाणे अहमदपूर येथे पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात उपविभागीय पोलिस अधिकारी चाकूर तथा सहाय्यक पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी यांचे नेतृत्वातील पथकामधील पोलीस अधिकारी/अंमलदार यांनी सदरची कामगिरी केली आहे. पुढील तपास अहमदपूर पोलिस करीत आहेत.

# प्रेम म्हणजे प्रेम असतं.. तुमचं आमचं सेम असतं

**प्रेम ही ईश्वराने मानवाला दिलेली खुप मोठी देणगी आहे आणि आयुष्यात खरं प्रेम एकदाच होतं. ईश्वराच्या मनात असते त्यावेळी अचानक त्याला 'ती' आवडु लागते आणि तिलाही 'तो' आवडु लागतो. आनंदाला पारावार राहत नाही. दुनियादारी, भानगडी तेल लावत जातात. आपण एकटेच स्वतःशीच हसतो. जगातले सर्व काही मिळाल्याची भावना तयार होते. एकमेकांशिवाय अजिबात करमत नाही. एकमेकांची खूप खूप काळजी घ्यावीशी वाटते. हृदयामध्ये धडधड नेहमीच जोरात चालू होते. एक दिवस बोलणे झाले नाही तरी चुटचुट लागुन राहते. दोघेही जेवल्याशिवाय घास जात नाही आणि दोघेही भेटल्याशिवाय आस जात नाही. तिचा हात हातात घेतल्याशिवाय राहवत नाही. तिचा चेहरा बघितल्याशिवाय चैन पडत नाही. झोप उडते. तिचा चेहरा चंद्रच जणु भासतो. तिच्या सौंदर्याचे वर्णन करताना आपण कवी नसताना सुद्धा आपल्यातला कवी जागा होतो. मग त्या कवितेतून कधी ती चंद्र बनुन येते, कधी ती चांदण्या बनुन येते, कधी चंद्रावरचा डाग तिच्या गालावरचा तिळ बनुन येतो. कधी ती लाल गुलाबच फुल बनुन येते.**

कधी– कधी तर हदच होते आणि चक्क ती स्वप्नात येते. कोणाला ती जिलेबीसारखी गोड दिसायची म्हणून कोणी तिला जिलेबी म्हणायचं. कोणाला ती गुलाबजाम इतकी गोड हसायची म्हणुन कोणी तिला गुलाबजाम म्हणायचं. कधी अचानक ती बासुंदी भासते. कधी ती वडापावसारखी तिखट पण असते. ती जेवली तरच आपण जेवायचं. ती नाही जेवली तर आपण पण नाही जेवायचं, मग तिने लटक्या रागाने म्हणायचं की 'तु जेवणार आहेस की नाहीये' आणि मगच आपण जेवायचं. कारण तिला त्याचा आणि त्याला तिचा ध्यास लागलेला असतो. कधी कधी तिच्या घरी जी भाजी असते ती आपल्या ही घरी होते.. मग 'सेम–सेम' होतं. कधी कधी तिने मेथीची भाजी बनवली की आपली पण मेथीच असते. तिने गवार बनवली की आपली पण गवारच असते.. मग पुन्हा 'सेम – सेम' होतं. त्याच्या पण पुढं जाऊन काय होतं माहिती आहे? त्याच्या पुढे जाऊन आपल्याला तिच्या हातची भाजी भाकरी लई आवडते. आपण म्हणतो मला तुझ्या हातची भाजी खायची पण ती संधी आपल्याला मिळत नाही. कधी मग सुरू होतं चोरुन–चोरुन भेटणं. तिला भेटायला आपण तब्बल दोन तास अगोदरच येवुन थांबायचं. 'ती' भेटल्यावर आताच आलोय असं सांगायचं. कधी–कधी तिनेही आपल्यासाठी एक तास आधी यायचं आणि भेटल्यावर आताच आलेय अस सांगायचं. बसस्थानकात अशा शेकडो बस तिच्यासाठी सोडायच्या पण तिला नाही सोडायचं. कधी भेट नाही झाली किंवा बोलणं नाही झालं तर उगाचच चुटचुट लागुन राहते . अश्रू अलगद बाहेर येतात. ज्या हाताचा उलटा पंजा डोळ्याला लावायची कधीच आवश्यकता पडली नाही, त्या दिवशी मात्र हाताच्या उलट्या पंजाने



अश्रु दुर सारायची गरज खुप भासते. असं म्हटलं जातं की जुने ऋणानुबंध असल्याशिवाय कोणी कोणाच्या आयुष्यात येत नाही म्हणूनच ती आपल्या आयुष्यात आलेली असते. तिच्यासाठी आपण एकादशीचा उपवास धरायचा. मग तिने म्हणायचं माझ्यासाठी उपवास नको धरत जावुस. आपण मात्र शेकडो वर्षे उपवासाच व्रत पाळायचं. प्रेम इतकं नितांत असतं की तिने आठवण काढल्यानंतर आपल्याला उचकी लागतेच आणि आपण आठवण काढल्यानंतर तिला उचकी लागतेच. कधी कधी ठसका पण लागतो. मग नंतर आपण तिला विचारायचं की 'तु माझी आठवण काढली होतीस का?' तिने आश्चर्याने विचारायचं की, 'तुला कसं माहिती?' आपण म्हणायचं, 'उचकी लागली होती ना'. असं हे प्रेम असतं. मंगेश पाडगावकर यांनी म्हटल्याप्रमाणे 'तुमचं आमचं सेम सेम असतं'. ज्यांना आयुष्यात असं झालं त्यांनाच आयुष्यात खरं प्रेम झालेलं असतं. प्रेमाला जात, पात, धर्म, प्रांत, विवाहित, अविवाहित अशा मर्यादा नसतात. अगदी सिमारेषा अर्थात 'लाईन ऑफ कंट्रोल' नसतात. म्हणुनच की काय प्रत्यक्ष नियंत्रण रेषेच्या पलीकडे अर्थात भारतीय लोकांचे पाकिस्तान, बांगलादेशात पण प्रेम झाल्याची जिवंत उदाहरणे आपण पाहिलेली आहेत. कारण प्रेम ही एक निसर्गाने मानवाला दिलेली अनमोल अशी भेट आहे. ती एक पवित्र भावना आहे. प्रेम आयुष्यात एकदातरी करुन बघावं. कोणावर तरी एकदा मरुन बघावं. कोणासाठी तरी आज लवकर निघावं. प्रेम आयुष्यात एकदा तरी करून बघावं. खरं प्रेम आयुष्यात फक्त आणि फक्त एकदाच होतं. म्हणून आपल्या आयुष्यात आलेली माणसं ही काही उगाच आलेली नसतात. तयार होणाऱ्या प्रत्येक गोष्टीमागे आणि नात्यामागं काहीतरी कारण असत. नाहीतर करोडोंची आबादी असणाऱ्या देशात याच व्यक्तीशी आपली ओळख का होते? कोण घडवुन आणतं हे? याचा मास्टर माईंड अर्थात सूत्रधार कोण? याचे उत्तर या जगात कोणीही देऊ शकत नाही.

पण प्रेमाची दुसरी बाजू आपण बघत नाही. या जगात प्रत्येक जण खरं प्रेम करत नसतो. प्रेम करणारे खुप असतात पण ते निभावणारे फारच थोडे मुलं आणि मुली या जगात आपल्याला आढळून येतात. प्रेमाच्या प्रांतात 'सोडून जाणे' हा विषयच नसतो. कारण जी व्यक्ती तुमच्यावर खरं प्रेम करते ती कधीच आपल्या आवडत्या व्यक्तीला दुःखाच्या सागरात सोडू जात नाही. जी व्यक्ती सोडून जाते तिने आपल्यावर खरं प्रेम केलेलं नसतं. ते एक नाटक असतं. ज्यात आपण फसले जातो आणि पर्यायाने बरबाद होतो. जिचं आपल्यावर खरं प्रेम असतं ती व्यक्ती कितीही संकटे आली तरी धरलेला हात कधीच सोडत नाही. जी व्यक्ती धरलेला हात सोडते ती धोकेबाज असते. अशावेळी खुप असह्य मनस्ताप, दुःख, यातना होतात. शेकडो सुर्य उगवले आणि मावळले तरी आठवणींचा एकच सुर्य आपल्या आयुष्यातुन मावळायचे नाव घेत नाही. एखादीनं एखाद्यांवर खुप प्रेम करावं. निदान तसं नाटक करावं. मग त्याला स्वप्न दाखवावीत. त्यानं तिच्यासाठी सर्व काही सोडायला तयार राहावं. तिनं भेटावं. त्यानही भेटावं. त्यानं तिची वाट पाहावी. त्यानं तिच्यासाठी तासभर आधीच यावं. अन म्हणावं आताच आलोय. रात्र–दिवस तिच्या आठवणीत जगावं. तिनं मात्र मन भरल्यानंतर त्याला दुर ढकलावं. त्याच्यावर नाही ते आरोप करावेत. त्याला आरोपीच्या पिंजर्यात उभा करावं. त्याला गुन्हेगार ठरवावं. कुटुंबीयापुढे त्याची मानहानी करावी. त्याच्या ज्या नजरेनं प्रेम दिलं त्या नजरेला खाली पाहायला लावावं. त्याची मात्र तिच्या आठवणीशिवाय दिवस आणि रात्र न व्हावी आणि तिने मात्र विसरून जावं यापेक्षा मोठा घात या जगात दुसरा कोणताही नसतो. कारण ती आनंदी राहते आणि तो जळत राहतो. अस थोड्याच लोकांच्या बाबतीत घडतं. हेच तिचं जगातील सर्वात मोठं पाप असतं. एवढं पाप करुनही तो तिचं सुखच मागतो. पण ईश्वराच्या दरबारात पापाला फळ ही असतातच.

धोकेबाज व्यक्ती आपण न केलेल्या चुकांचे खापर आपल्यावर फोडते. आपली मानहानी करते. आपली बदनामी करते. आपल्यालाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभी करते. यापेक्षा मोठे दुःख एखाद्याचा आयुष्यात दुसरे असु शकत नाही. ज्या व्यक्तीने आपल्यावर प्रेम करावं किंवा निदान तसं नाटक करावं आणि जन्मभर साथ देण्याची शपथ घ्यावी. अचानक एक दिवस आपल्यावर बेछुट आरोप करावेत. स्वतःच्या कुटुंबियापुढे आपली मानहानी करावी, असे अनेक प्रसंग घडतात आणि यापेक्षा मोठी वेदना नाही, म्हणून तरुण तरुणींनी प्रेम आंधळं असले तरी ते डोळसपणे करावं. कोणावर इतका विश्वास ठेवू नये की आपल्या मनात आत्महत्याच्या विचारांनी घर करावं. कोणामध्ये इतकं गुंतु नये की आपल्याला त्यातुन बाहेर यायचाच विसर पडावा. कोणावर इतके प्रेम करू नये की त्यानं आपल्या भावनांशी खेळुन निघुन जावं. ती सोडुन जाणारी व्यक्ती तिकडे खुश असते आणि आपण ईकडे आपल्या आयुष्याची राखरांगोळी करतो. त्यामुळे तरुण–तरुणींनी एक गोष्ट लक्षात घ्यावी की प्रेम करणारे खुप आहेत पण निभावणारे खुप कमी असतात. जो आपल्या प्रेमाला सोडुन जातो तो आयुष्यभर पश्चाताप करत राहतो. जाता जाता एकच...जी जीवाच्या पलीकडची नाती तयार होतात. ती जीवाच्या पलीकडे जपावीत.

**लेखक- दत्ता पवार**
**(मो- ९६५७६०८३३२)**

## शिक्षणातील गौरवशाली परंपरा टिकविण्याच..

(पान १ वरुन) : विद्यार्थी आणि पालक यांच्या सहकार्यातून ही शिक्षण चळवळ यशस्वी होते. शिक्षण हे माणसाला विचार करण्याची ताकत देते. अन्यायाविरूध्द लढण्याचे बळ देते, गुणवंत, ज्ञानवंत, प्रज्ञावंत यांच्याबरोबर चारित्र्यसंपन्न होण्यासाठी शिक्षणाची गरज असल्याचे सांगून सध्या इंग्रजीकडे विद्यार्थ्यांचा कल मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे. परंतु मातृभाषेचे महत्त्व लक्षात घेऊन मातृभाषा टिकविण्याचे काम आपण सर्वांनी करावे. मराठी विषय सक्तीचा करावा असे मतही राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी यावेळी बोलताना व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज, स्वामी विवेकानंद व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. तसेच जेएसपीएम संचलित अराईज इंटरनॅशनल स्कूलच्या इमारतीचे उद्घाटन, स्वामी विवेकानंदाच्या पूर्णाकृती पूतळ्याचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

तसेच प्रमुख मान्यवरांचे स्वागत शाल, पुष्पगुच्छ व भगवान श्रीकृष्णाची मूर्ती देऊन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जेएसपीएम संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अब्दूल गालिब शेख यांनी केले तर आभार जेएसपीएम संस्थेचे उपाध्यक्ष अजितसिंह पाटील कव्हेकर यांनी मानले.

**जेएसपीएम संस्थेचे काम राज्यातील शिक्षण संस्थासाठी दिशादर्शक**

पूर्वीच्या शिक्षण व्यवस्थेमध्ये काही ठिकाणी वशिला चालत होता. परंतु आता मात्र शिक्षण क्षेत्रामध्ये पारदर्शकता आलेली आहे. पेपरफुटीमध्ये दोषीला शिक्षा व दंड देण्याचे काम होत आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केलेल्या कायद्यामुळे अशा गोष्टींना आळा बसला असून आता मेरिटला प्राधान्य देण्यात येत आहे. जेएसपीएम संस्थेनेही गुणवत्तेला प्राधान्य देऊन अध्यात्म, विज्ञान व व्यावसायिकतेवर आधारित शिक्षणातून तेजस्वी तरुण घडविण्याचे काम सुरू केलेले आहे.

तसेच विविध खेळांच्या माध्यमातून राज्य व राष्ट्रीय पातळीवर विद्यार्थ्यांनी पारितोषिके मिळविली आहेत. याबरोबरच नॅशनल सायबर ऑलिम्पियाड व नॅशनल सयीस ऑलिम्पियाड या स्पर्धा परीक्षेमध्ये गोल्ड मेडल मिळविले आहेत. याचा सार्थ अभिमान आहे. त्यामुळे राज्यातील विविध शैक्षणिक संस्थासाठी जेएसपीएम संस्थेचे काम दिशादर्शक ठरणारे आहे असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी केले.

**विवेकानंदांच्या विचारावर चालणारे कव्हेकर साहेब - ना.संजय बनसोडे**

छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबसाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतीबा फुले व स्वामी विवेकानंदांचे विचार आत्मसात करून या विचारावर जेएसपीएम संस्थेची वाटचाल सुरू ठेवण्याचे काम गेल्या चाळीस वर्षापासून भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी सुरू ठेवलेले आहे. आज त्या छोट्याशा रोपट्याचे वटवृक्षात रूपांतर झालेले आहे.

हे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान असतानाही देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे काम देशाला पुढे नेणारे आहे. मंत्री झाल्यापासून त्यांच्या समवेत सहा कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचा योग आला. त्यांच्या विचारातून देवाकडून राष्ट्राकडे आणि राष्ट्राकडून देशाच्या प्रगतीकडे जाण्याचा संकल्प केला असून त्याच विचारावर अध्यात्म, विज्ञान आणि व्यावसायिकतेची जोड देऊन कव्हेकर साहेबांचे काम सुरू आहे. त्यामुळे स्वामी विवेकानंदांच्या विचारावर चालणारे कव्हेकर साहेब अशी त्यांची ओळख राज्यात आणि देशात निर्माण झालेली आहे असे मौलिक विचार राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना.संजय बनसोडे यांनी व्यक्त केले.

**२०४७ पर्यंत भारत महासत्ता बनून जगाचे नेतृत्व करेल -माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर**

जगामध्ये बौध्दिक संपदेचा प्रभाव आहे. सर्वात हुशार तरुण भारतात आहेत आणि सर्वात सुशिक्षीत बेरोजगारांची संख्याही भारतातच आहे. जगामध्ये बिल गेट्स, बराक ओबामा व देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे बौध्दिकतेच्या जोरावर जगावर राज्य करीत आहेत.

त्यामुळे जगामध्ये झालेल्या सर्वेमध्ये ७८ टक्के नागरिकांनी मोदीजींना सर्वाधिक पसंती दिलेली आहे. मोदीजींच्या नेतृत्त्वाखाली देशाची गतीने प्रगती होत आहे. देशाची अर्थव्यवस्था दहाव्या क्रमांकावरून पाचव्या क्रमांकावर आली आणि प्रगतीच्या जोरावर आता तिसऱ्या क्रमांक येणार असल्याचा विश्वासही त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला. त्यामुळे खऱ्या अर्थाने १८ व्या शतकात स्वामी विवेकानदांनी शिकागो येथील धर्मपरिषदेमध्ये केलेली भविष्यवाणी खरी ठरून २०४७ मध्ये मोदीजींच्या नेतृत्त्वाखाली भारत महासत्ता बनून जगाचे नेतृत्त्व करेल असा विश्वास भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी व्यक्ता केला.

# आई-वडिलांच्या प्रेमाचा झरा कधीही आटत नसतो - ह.भ.प.भागवताचार्य अमोलजी महाराज बोधले

**लातूर : आपल्या मुलांच्या सुख-समाधानासाठी देह झिजवणाऱ्या आई-वडिलांच्या प्रेमाचा झरा कधीही आटत नसतो. त्यांचे आर्शीवाद सदोदीत आपल्या पाठीशी असतात, तेंव्हा प्रत्येकांनी आपल्या आई-वडिलांची सेवा करून पुण्यवान बनावे असा हितोपदेश श्री संत मानकोजी महाराज बोधले यांचे वंशज ह.भ.प. भागवताचार्य अमोल महाराज बोधले यांनी खांडगाव येथील कीर्तनरुपी सेवेत बोलत असताना केला.**

ह.भ.प. भागवताचार्य अमोल महाराज बोधले यांनी भावबळी विष्णुदास । नाही नाश पावत ।। या अभंगावर चिंतन करताना म्हणाले की, खरा विष्णुदास कोण, तो कसा नाश पावत नाही, जरी तो शरीराने नाश पावला तरी किर्तीरुपाने, कार्यरुपाने जिवंत राहतो. श्री संत ज्ञानेश्वर महाराज, श्री संत तुकोबाराय, श्री संत माणकोजी महाराज बोधले, छत्रपती शिवाजी महाराज, धर्मवीर संभाजी महाराज आदी महापुरुष आजही जिवंत आहेत असे अनेक दाखले व उदाहरण देऊन आपण आपल्या आई वडील यांची नियमित सेवा केली पाहिजे, कारण त्यांनी आपल्यासाठी जे कार्य केलेले आहे ते नाश न पावणारे आहे असे विवेचन केले.

जो बाप आपल्या पाठीशी उभा असतो तोपर्यंत कसलेही भय नसतं. ज्यांनी आपलं जीवन समाजसेवेसाठी वाहिलं ते समाजउपयोगी घडत असतात. जीवन संपल्यानंतर जे जगतात त्याला संत म्हणतात. आई- वडीलांसारखे मोठे दैवत नाही. गायीचे रक्षण करा अन् आई वडीलांची सेवा करा, तुमचे जीवन सुखी झाल्याशिवाय राहणार नाही असे प्रतिपादन करून देवाची प्राप्ती करण्यासाठी भक्ती लागते, तसेच प्रत्येकाला सुख पाहिजे असे वाटते. सुखासाठी तो प्रयत्न करतो, मुलांना सुख मिळावे असे फक्त आई वडील यांनाच वाटते. आई- वडिलांची इच्छा ही मुलांच्या सुखात भले पाहते, माणुस हा दुःखात असेल तर तो परमेश्वराजवळ राहतो, दुःखातच त्याला



भगवंताची भक्ती घडते. सुख मिळाले तर त्याच्याकडुन भगवंताचे भजनही होत नाही. जर दुःख असेल तर त्याला भगवंताचा विसर पडत नाही. जीवनातील दुःख वजा व्हावे वाटत असेल तर देवाची प्राप्ती होणे गरजेचे आहे. प्रत्येक माणुस कोणत्या ना कोणत्या कारणाने दुःखी असतो. काही शारिरीक काही तण, मन, धनाने दुःखी असतो. प्रत्येक माणुस पैसा कमवितो परंतु त्याचा उपयोग घेत नाही. भारताची संस्कृती ही इतर देशांपेक्षा सुंदर असुन, भारतातील नागरीक ती संस्कृती विसरत चालला आहे. आपली संस्कृती प्रत्येकाने जपावी तेव्हाच भारत देश सुधारेल. घरातच आपल्या वृध्द आई वडिलांची मनोभावे सेवा करावी त्याच्यांच चरणात सर्व तिर्थक्षेत्र आहेत. त्यापेक्षा त्यांची सेवा म्हणजेच तिर्थक्षेत्र होय. यावेळी खांडगांव येथील प्रकाश नगर परिसरातील सरस्वती विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक चंद्रकात साळुंके सर, शशिकांत साळुंके, सुर्यकांत साळुंके व समस्त देशमुख (साळुंके) परिवारातील नातेवाईक व महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकर, प्रवचनकार, मृदगवादक, गायनाचार्य, टाळकरी, भजनी मंडळ, भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# *भव्य महासंस्कृती महोत्सव आणि विभागीय १०० वे नाट्यसंमेलन अंतर्गत आजपासून विविध कार्यक्रम*

**ऋदिग्गज कलाकारांचा सहभाग; नाट्य, गीत व सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल**

**लातूर, (जिमाका): राज्य शासनाचा पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग आणि लातूर जिल्हा प्रशासनामार्फत भव्य महासंस्कृती महोत्सव, तसेच अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्यावतीने १०० व्या नाट्य संमेलनाचे लातूर येथे आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत आयोजित कार्यक्रमांमध्ये नाट्य, कला आणि संगीत क्षेत्रातील दिग्गज कलाकारांचा सहभाग असणार आहे. ११ फेब्रुवारी २०२४ पासून कार्यक्रमांना सुरुवात होणार असून मुख्य उद्घाटन कार्यक्रम १३ फेब्रुवारी रोजी होणार आहे. या महोत्सवात आयोजित सर्व कार्यक्रमांना जिल्हावासियांनी उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे आणि अखिल भारतीय नाट्य परिषदेचे शैलेश गोजमगुंडे यांनी केले आहे.**

दयानंद महाविद्यालय मैदान, दयानंद सभागृह आणि मार्केट यार्ड येथील दगडोजीराव देशमुख सभागृहात महासंस्कृती महोत्सव आणि विभागीय १०० वे नाट्य संमेलनातील कार्यक्रम होणार आहेत. या महासंस्कृती महोत्सवामध्ये १३ ते १५ फेब्रुवारी या कालावधीत दयानंद महाविद्यालय मैदान येथे शिवकालीन छायाचित्र आणि शस्त्र प्रदर्शन, स्थानिक महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन व विक्री, खाद्यपदार्थांची दालने उभारण्यात येणार आहेत.

***११ फेब्रुवारीला पूर्वरंग कार्यक्रमात नाटक, हास्यधारा, गझलसंध्याचे आयोजन***

महासंस्कृती महोत्सव आणि विभागीय १०० वे नाट्यसंमेलन अंतर्गत ११ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता दगडोजीराव देशमुख साभृहात 'बोक्या सातबंडे' हे व्यावसायिक बालनाट्य होणार आहे. तसेच दुपारी १ वाजता 'बालनाट्य चर्चासत्र व नाट्यछटा' हा प्रकाश पारखी यांचा कार्यक्रम होईल. याच ठिकाणी सायंकाळी ७ वाजता 'अर्ध्याच्या शोधात दोन' हे नाटक होणार आहे. दयानंद सभागृह येथे ११ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजता 'हास्यधारा' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून याचे सूत्रसंचालन रामदास फुटाणे हे करणार आहेत. तसेच नितीन देशमुख, प्रशांत मोरे, भरत दौंडकर, अरुण पवार, आबा पाटील, इंद्रजीत घुले, गुंजन पाटील यांचा सहभाग राहील. रात्री ८ वाजता सुप्रसिद्ध गझलकार भीमराव पांचाळे यांचा 'गझलसंध्या' कार्यक्रम होईल.




***१२ फेब्रुवारीला नाट्यदिंडी, तू तू मी मी आणि कृष्ण विवर नाटके सादर होणार***

सोमवारी, १२ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता गंजगोलाई ते दयानंद महाविद्यालयापर्यंत नाट्यदिंडीचे आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये सुप्रसिद्ध अभिनेते मोहन जोशी, भरत जाधव, संकर्षण करडे, विजय गोखले, अभिनेत्री स्पृहा जोशी सहभागी होणार आहेत. दयानंद महाविद्यालयाच्या मैदानावर सायंकाळी ५ वाजता संकर्षण कऱ्हाडे आणि स्पृहा जोशी यांचा 'संकर्षण व्हाया स्पृहा' हा कार्यक्रम होईल. याचठिकाणी रात्री ८ वाजता 'तू तू मी मी' हे व्यावसायिक नाटक सादर होईल. यामध्ये सुप्रसिद्ध अभिनेते भरत जाधव हे १४ भूमिकेत असतील, तसेच कमलाकर सातपुते यांचाही सहभाग असेल. दगडोजीराव देशमुख सभागृह येथे रात्री ८ वाजता अभिजित झुंजारराव दिग्दर्शित 'कृष्ण विवर' हे प्रायोगिक नाटक सादर होईल.

***१३ फेब्रुवारीला उद्घाटन सोहळा, सुगम गायन, लोककला जागर आणि नाटकांचे सादरीकरण***

महासंस्कृती महोत्सव आणि विभागीय १०० वे नाट्यसंमेलनाचा उद्घाटन सोहळा १३ फेब्रुवारीला सकाळी ११ वाजता दयानंद सभागृह येथे होणार आहे. त्यानंतर याच सभागृहात सुप्रसिद्ध गायक राहुल देशपांडे यांचा सुगम गायनाचा कार्यक्रम होईल. दुपारी ४ वाजता 'सिनेमातील नाटक' या विषयावर परिसंवाद होणार असून यामध्ये गजेंद्र आहिरे, ज्येष्ठ नाट्य व चित्रपट दिग्दर्शक संजय पाटील, निर्माता चंद्रशेखर सांडवे, पत्रकार अश्विनी धायगुडे यांचा सहभाग राहील. सायंकाळी ६.३० वाजता अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्यावतीने 'मुंगी उडाली आकाशी' हे नाट्य अभिवाचन सादर होणार आहे. दयानंद महाविद्यालयाच्या मैदानावर सायंकाळी ५ वाजता स्थानिक कलावंतांचा 'लोककला जागर' हा कार्यक्रम सादर होईल. यामध्ये भूपाळी, गण, गवळण, अभंग, भारुड, पोवाडा, वगनाट्य कार्यक्रमाचा यामध्ये समावेश आहे. तसेच यावेळी ज्येष्ठ रंगकर्मींचा अभिनेते मोहन जोशी यांच्या हस्ते सन्मान करण्यात येईल. रात्री ८ वाजता मराठवाडा मुक्तीसंग्रामावरील 'गाथा मुक्तिसंग्रामाची' हे भव्य नाटक होईल. दगडोजीराव देशमुख सभागृहात रात्री ८ वाजता 'नेकी' हे प्रायोगिक नाटक सादर होईल.

***१४ फेब्रुवारीला वऱ्हाड निघालय लंडनला, महाराष्ट्राचा हास्यकल्लोळ, परिसंवाद***

महोत्सवामध्ये १४ फेब्रुवारीला दयानंद महाविद्यालय मैदानावर सकाळी ११ वाजता अभिनेते संदीप पाठक यांचे 'वऱ्हाड निघालय लंडनला' हे व्यावसायिक नाटक आयोजित करण्यात आले आहे. तसेच दुपारी २ वाजता 'नाटक माझ्या चष्म्यातून' हा परिसंवाद होणार असून यामध्ये आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार अमित विलासराव देशमुख, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, पत्रकार विलास बडे यांचा सहभाग राहील. सिनेअभिनेत्री सोनाली कुलकर्णी निवेदन करतील. सायंकाळी ५ वाजता संमेलनाध्यक्ष जब्बार पटेल आणि अभिनेत्री नीलम शिर्के यांच्या उपस्थितीत संमेलन हस्तांतरण सोहळा होईल. सायंकाळी ६ वाजता शाहीर तुकाराम सुवर्णकार व संच शिवगीते व पोवाडा सादर करतील. सायंकाळी ७ वाजता 'महाराष्ट्राचा हास्यकल्लोळ' हा कार्यक्रम होणार आहे. यामध्ये महाराष्ट्राची हास्यजत्रामधील कलाकारांचा सहभाग राहील.

दयानंद सभागृहात १४ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता स्थानिक कलाकारांचा नाट्यगीत महोत्सव आणि दुपारी २ वाजता नाट्यवाचन महोत्सव कार्यक्रम होईल. तसेच दगडोजीराव देशमुख सभागृहात रात्री ८ वाजता 'साखरेचे पाच दाणे' हे स्थानिक नाटक सादर होईल.

***१५ फेब्रुवारीला मुक्काम पोस्ट आडगाव, महेश काळेंचे सुगम गायन***

१५ फेब्रुवारी रोजी दगडोजीराव देशमुख सभागृह येथे सकाळी १० वाजता स्थानिक कलाकारांचा एकांकिका आणि एकपात्री महोत्सव होईल. रात्री ८ वाजता 'बॅरिस्टर' हे स्थानिक नाटक सादर होईल. दयानंद सभागृह येथे सकाळी १० वाजता स्थानिक कलाकारांचा बालनाट्य, नाट्यछटा कार्यक्रम होईल. तसेच सायंकाळी ६ वाजता पुरुषोत्तम बेर्डे दिग्दर्शित 'मुक्काम पोस्ट आडगाव' हे व्यावसायिक नाटक सादर होईल. दयानंद महाविद्यालयाच्या मैदानावर सायंकाळी ७ वाजता सुप्रसिद्ध गायक महेश काळे यांच्या सुगम गायन कार्यक्रमाने महोत्सवाचा समारोप होणार आहे.

***लातूरच्या वेळ अमावास्येचे वैशिष्ट्य अधोरेखित होणार***

लातूर जिल्ह्यात वेळ अमावास्येला विशेष महत्व आहे. यादिवशी शेतामध्ये केली जाणारी पूजा, त्यानिमित्ताने तयार करण्यात येणार खाद्यपदार्थ यामधून लातूरच्या संस्कृतीचे दर्शन घडते. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या संकल्पनेतून महासंस्कृती महोत्सवामध्ये लातूर जिल्ह्यातील वेळ अमावस्येचे दर्शन घडविणारे स्वतंत्र दालन उभारण्यात येणार असून यानिमित्ताने लातूरच्या संस्कृतीची ओळख बाहेरून येणाऱ्या कलावंत, रसिकांना होईल.

# विद्यार्थ्यांनी शेतकरी आणि आईवडीलांच्या कष्टाचे सातत्याने स्मरण करावे प्रसिद्ध हास्य कलाकार बालाजी सुळ यांचे विद्यार्थ्यांना आवाहन

**महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात शिवबसव वार्षिक स्नेहसंमेलन २०२४चे शानदार उद्घाटन**

लातूर : श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाचे शिवबसव वार्षिक स्नेहसंमेलन २०२४ उद्घाटन समारंभ महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहामध्ये आयोजित करण्यात आला होता यामध्ये ते उद्घाटक म्हणून विद्यार्थ्यांशी संवाद साधताना बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव मन्मथ अप्पा लोखंडे हे होते तर विचारमंचावर संस्थेचे उपाध्यक्ष माधवराव पाटील तपसेचिंचोलीकर, कार्यकारी संचालक ॲड. काशिनाथ साखरे, संचालक ॲड. श्रीकांत अप्पा उटगे, अखिल भारतीय नाट्य परिषदेचे सदस्य नरेश बिडवे, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, संयोजन समिती सदस्य प्रा. विजयकुमार धायगुडे, प्रा. कल्पना गिराम, प्रा. गोविंद पांढरे, प्रा. व्यंकट दुडीले यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमेला उपस्थित सर्व मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले आणि दीप प्रज्वलनाने या कार्यक्रमाची सुरुवात झाली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी संगीत विभागाचे प्रा. विजयकुमार धायगुडे, प्रा. विश्वनाथ स्वामी, प्रा.



गोविंद पवार आणि विद्यार्थिनींनी स्वागत गीत सादर केले.

पुढे बोलताना बालाजी सुळ म्हणाले की, आपण आई-वडिलांचा सन्मान केला पाहिजे. त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून चारित्र संपन्न बनण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपल्या पालकांची मान सातत्याने आपल्या कार्यामुळे उंचावेल असेच कार्य आपल्या हातून व्हावे. स्त्रियांचे मातृत्व ही श्रेष्ठता असते त्यामुळे स्त्रियांचाही सन्मान सर्वांनी केला पाहिजे. संपूर्ण समाजाचा पोशिंदा म्हणून शेतकऱ्याची दुःख आपण जाणून घेतले पाहिजे असे सांगून विविध हिन्दी आणि मराठी कलाकार आणि राजकीय नेते यांच्या आवाजाच्या हुबेहूब नकला करून उपस्थित मान्यवर आणि विद्यार्थ्यांचे मने जिंकली.

आपल्या अध्यक्षीय समारोपात संस्थेचे सचिव मन्मथ अप्पा लोखंडे म्हणाले की, वार्षिक स्नेहसंमेलन हा आनंदाचा सोहळा असतो. हा आनंद व्यक्त करताना संयमाने आणि शिस्तीने विद्यार्थ्यांनी तो व्यक्त करावा. जीवनात यशस्वी होण्याकरिता प्रचंड मेहनत, वेळेचे नियोजन, जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वास याची नितांत गरज असते. परीक्षेला सामोरे जाताना धैर्य आणि आत्मविश्वासाने गेले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या यशात शिक्षक आणि पालक यांचे यश लपलेले असते त्यामुळे नैतिक जबाबदारी घेऊन मार्गक्रमण करावे असेही ते म्हणाले.

यावेळी प्रास्ताविकपर मनोगत उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे यांनी केले तर प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी वार्षिक स्नेहसंमेलनासाठी विद्यार्थ्यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या. तर प्रमुख अतिथींचा परिचय पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे यांनी करून दिला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कल्पना गिराम, टि. घन:श्याम यांच्यासह कु. अरब बुशरा, अवधूत कुलकर्णी, आरती वाघमारे यांनी केले तर आभार प्रा. व्यंकट दुडीले यांनी मानले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संयोजन समितीतील सर्व सदस्यांनी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील कला, वाणिज्य, विज्ञान आणि व्होकेशनलच्या विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

## *महासंस्कृती महोत्सवात सादरीकरणासाठी स्थानिक कलावंतांनी नाव नोंदणी करण्याचे आवाहन*

लातूर, (जिमाका) : राज्य शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग, लातूर जिल्हा प्रशासनामार्फत भव्य महासंस्कृती महोत्सव, तसेच अखिल भारतीय नाट्य परिषदेच्यावतीने १०० व्या नाट्य संमेलनाचे लातूर येथे आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत आयोजित कार्यक्रमात स्थानिक निवडक कलावंतांना सादरीकरणाची संधी देण्यात येणार आहे. यासाठी कलावंतांनी १२ फेब्रुवारी रोजी दुपारी २ वाजेपर्यंत जिल्हा परिषदेच्या मध्यामिक शिक्षण विभागात नाव नोंदणी करण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

दयानंद महाविद्यालय मैदान, दयानंद सभागृह आणि मार्केट यार्ड येथील दगडोजीराव देशमुख सभागृहात महासंस्कृती महोत्सव आणि विभागीय १०० वे नाट्य संमेलनातील कार्यक्रम होणार आहेत. महासंस्कृती महोत्सवामध्ये १३ ते १५ फेब्रुवारी या कालावधीत होणाऱ्या कार्यक्रमात सादरीकरणात स्थानिक कलावंतांना निवडक सादरीकरणाची संधी देण्यात येणार आहे. यासाठी स्वतंत्र समिती स्थापन करण्यात आली आहे. ही समिती कलावंतांचे सादरीकरण घेवून निवड करेल.

सादरीकरणासाठी मर्यादित वेळ राहील. कलाकारांच्या सादरीकरणातील गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल. याबाबत समितीचा निर्णय अंतिम राहील. तरी लातूर जिल्ह्यातील कलावंतांनी जिल्हा परिषदेच्या माध्यामिक शिक्षण विभागात अथवा माध्यमिक शिक्षणाधिकारी नागेश मापारी (भ्रमणध्वनी क्र. ९४२२७२५९१९) किंवा प्राथमिक शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे (भ्रमणध्वनी क्र. ८२७५२३८७८८) यांच्याकडे नाव नोंदवावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# भारतीय बौद्ध महासभेच्या वतीनं त्यागमुर्ती माता रमाईस अभिवादन

माजलगाव (प्रतिनिधि)भारतीय बौद्ध महासभा माजलगाव तालुका व शहर शाखेच्या वतीन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक सामाजीक चळवळी बरोबरच संसाराचा गाडा समर्थपणे ओढणाऱ्या त्यागमुर्ती माता रमाई जयंती निमित्त अभिवादन करण्यात आले.

दि.७ फेब्रुवारी बुधवार रोजी सकाळी १० वा. अभिवादन रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक माजलगाव येथे त्यागमुर्ती माता रमाई यांच्या प्रतीमेचे पुजन करुन रॅलीची सुरुवात करण्यात आली होती व समता सैनिक दलाच्या वतिने मानवंदना देऊन सांची बुद्धविहार डॉ.आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प येथे समारोप करण्यात आला.

यावेळी शहरातील व तालुक्यातील बौध्द उपासक – उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. दुपारी १२ वा.प्रमुख व्याख्यात्या आद. कविताताई भिमराव सिरसट केंद्रिय शिक्षिका तथा जिल्हा महिला सचिव भारतीय बौद्ध महासभा बीड पुर्व यांनी आपल्या व्याख्यानातून उपासकांना अमुल्य मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय बौद्ध महासभा माजलगांव ता.उपाध्यक्षा लिलाताई उजगरे होत्या.सदरील कार्यक्रमासाठी भारतीय बौद्ध महासभा जिल्हा उपाध्यक्ष बीड पुर्व आद. एस.बी.मोरे,बीड ता.अध्यक्ष गुलाबराव धाईजे, शामभाऊ



वाघमारे,शेलापुरीच्या उपसरपंच शुशीलाताई घडसे,माजी संरक्षण उपाध्यक्ष गुलाबराव प्रधान,एन.बी. राजभोज बौद्धाचार्य बी.सी.डोंगरे,डी.एस.साळवे,वंचित बहुजन आघाडी चे अंकुश जाधव,पत्रकार अमर साळवे ,सुहास बोराडे सह तालुक्यातील धम्म उपासक उपासिका उपस्थित होते.यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा संघटक शाहीर मधुकर कदम आणि त्यांचा संच यांचे भिम – रमाईच्या गितांचा दणदणित कार्यक्रम संपन्न झाला.कार्यक्रमाचे प्रस्ताविक भारतीय बौद्ध महासभा शहर अध्यक्षा वंदनाताई घनघाव यांनी केले तर सुत्रसंचलन मंदोधरीताई खंदारे यांनी केले तर आभार भारतीय बौद्ध महासभा तालुका सचिव सिद्धार्थ वक्ते यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंदाताई साळवे,विशाखाताई वाघमारे, एस. डी. कासारीकर,डॉ.भागवत साळवे,मिलिंद गायकवाड, दयानंद साळवे,चक्रधर पोटभरे, राजेभाऊ साळवे, भानूदास साळवे ,मोहन काकडे, भगवान डोंगरे, बाबासाहेब घनघाव , आशाताई मोरे, शारदाताई टाकणखार,महानंदा टाकणखार, भारतीय बौद्ध महासभा तालुका व शहर शाखा माजलगावच्या पदाधीकारी यांनी परिश्रम घेतले.

# मशरूम उत्पादन क्षेत्रात यशस्वी उद्योजक बनण्यासाठी भरपूर वाव- प्रा.डॉ.सुनीता मगर यांचे प्रतिपादन

**दयानंद विज्ञान महाविद्यालयात ' मशरूम उत्पादनातून उद्योजकता ' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा**

लातूर : मशरूम ही बुरशी गटातील वनस्पती असून त्याच्या लागवडीसाठी कमी जागा,बियाणे,कच्चामाल व वातावरण पाहिजे.मशरूममध्ये अनेक औषधी गुणधर्म असतात.त्यामुळे दैनंदिन जीवनात जडत असलेले अनेक आजारही मशरूम सेवनाने टाळता येतात.मशरूमचे उत्पादन हे कमी वेळात,कमी खर्च व कमी जागेत घेता येते.हा व्यवसाय शेतीला व इतर उद्योगांना पूरक असा व्यवसाय आहे.अशा या मशरूम उत्पादन क्षेत्रात उद्योजकता वाढली पाहिजे. कारण कमी खर्चात नफा मिळवून देणारा असा हा जोडधंदा आहे.मशरूममध्ये पोषण तसेच प्रथिनेचा भरपूर समावेश असल्यामुळे निरोगी आरोग्यासाठी अत्यावश्यक आहे.मशरूम उत्पादन उद्योजकतेमध्ये भविष्यामध्ये करिअरच्या अनेक संधी आहेत,असे प्रतिपादन लातूरच्या कृषी महाविद्यालयातील प्रा.डॉ. सुनीता मगर यांनी केले.

येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने दि.०९ फेब्रुवारी २०२४ रोजी ' मशरूम उत्पादनातून उद्योजकता ' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले होते.यावेळी त्या प्रमुख पाहुणे व साधन व्यक्ती म्हणून बोलत होत्या.कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड होते.याप्रसंगी व्यासपीठावर वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ.चंद्रशेखर स्वामी व कार्यक्रम समन्वयक प्रा.विद्या हवालदार यांची प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे



प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड असे म्हणाले की,महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यक्रमाचे सातत्याने आयोजन करण्यात येते आणि अशा या आयोजनातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासात निश्चितपणे भर पडते.मशरूम हे अत्यंत उपयोगी असून त्यामध्ये पोषक घटक असल्याने त्याचे सेवन उत्तम आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे,हा व्यवसाय करून उद्योजक बनले पाहिजे.

प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्याचा परिचय कार्यक्रम समन्वयक प्रा.विद्या हवालदार यांनी करून दिले तर आभार प्रा.नुजहत शेख यांनी मानले.सूत्रसंचालन एम.एस्सी.वनस्पतीशास्त्र प्रथम वर्षाची नेहा कोरे व वैष्णवी स्वामी यांनी केले.यावेळी स्वाराती मराठवाडा विद्यापीठाच्या अभ्यास मंडळावर विद्यार्थीनी प्रतिनिधी म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल अंजली राऊत हिचा सत्कार करण्यात आला.

सदरील कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे,विभाग पदव्युत्तर समन्वयक डॉ.मनीषा गुरमे,प्रा.शिवाजी आळणे,प्रा.निकिता सुडे,प्रा.अश्विनी कांबळे,प्रा.अंजली निकम,रामचंद्र सलगर,नागनाथ भालेराव,नितेश बाहेती,पांडुरंग यमपुरे या सर्वांचे सहकार्य लाभले.याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि कार्यशाळेतील सहभागी विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

**बहिरट गर्दी ..**

गर्दी असते बहिरट
येत नाही ऐकू हाक
कुणी लुटा कुणाही
नसतोकुणाचा धाक
समोर लागली आग
जळून सगळे खाक
कोण धावे मदतीला
सजेशन देती लाख
फायदा घेऊन गर्दीत
चो-याकरती चलाख
काय करायचे आम्हां
कशाला खुपसू नाक
भांडण कुठे लागता
चित्रपट चाले इयाक
बघे करती महोत्सव
हो ट्रॅफिकजाम पॅक

**दिव्यांग गर्दी ..**

गर्दीत माणसे खूप
दिसती वेग वेगळी
माणुसकी हरवली
झापडेलावे सगळी
साक्षीदारां शोधता
गर्दी बनते आंधळी
प्रत्यक्ष दर्शी पुरावा
सापडत नसे मुळी
मदतीस धावे कोण
गर्दी तेंव्हा पांगळी
फोटो सेल्फी घ्यावे
बघे भरती सगळी
हाका मारता किती
बहिरीगर्दी आगळी
कारणे सांगून उगा
होतात का मोकळी
सल्ले देणारे हजारो
चालत जाते टकळी
दोषकुणाचा विचारे
मुकी होतात वेगळी

३)

**मनोवृत्ती ..**

लाचखोर लाच घेता
का होते डोळझाक
लाचखोर पकडाया
सापडे संधी इयाक
सिग्नलवरी पोलिस
सर्वं चाले ठीकठाक
पोलिस जाई तिथून
नियम कायदे खाक
सीसी टिव्ही लावता
फुंकून प्यायचे ताक
कॅमेरा नेमका बिघडे
कोसळून पडे धाक
लुटायला येता कुणी
स्वता सारे देऊ टाक
गर्दीलानसतात कान
कितीदा माराल हाक
आम्हां काय करायचे
कशाला खुपसू नाक
असे कसे झाले असे
उगाचं होता अवाक
समोर दिसे डोळे बंद
करा नंतर प्रश्न लाख
नकोतेच पाहतो कसे
नजर आमची काक

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६.**

# राजस्थान संस्थेच्या 'रन फॉर स्वराज्य' मॅरेथॉनला उत्तम प्रतिसाद-प्रतिक येरटे, शिवा द्विवेदी, आहान सुरवसे, ऋतुजा सोनी मॅरेथॉनचे विजेते

लातूरःपहाटेच्या प्रसन्न वातावरणात, चेहऱ्यावर उत्साह, प्रचंड



आत्मविश्वास, धावण्याची मनातील जिद्द आणि मॅरॅथॉन जिंकण्याचे धेय्य, स्पर्धकांचा उत्साह वाढवणाऱ्या स्फूर्तिदायक घोषणा, ढोल ताशांचा गजर आणि कानी पडणारे देशभक्तीपर गीत अशा या उत्साहपूर्ण वातावरणात श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्थेच्या वतीने संस्थेचे आद्य संस्थापक स्व. सेठ श्री पुरणमल लाहोटी यांच्या स्मृतिदिनानिमित्त शनिवारी (१० फेब्रुवारी) संस्था अंतर्गत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या 'रन फॉर स्वराज्य' या भव्य मॅरेथॉन स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

सकाळी सहा वाजता राजस्थान विद्यालयाच्या प्रांगणातून अतिरिक्त पोलिस अधिक्षक डॉ अजय देवरे यांनी हिरवा झेंडा दाखविल्यानंतर स्पर्धकांचा सुरू झाला धावण्याचा प्रवास.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लातूर जिल्हा ३५० व्या शिवराज्याभिषेक लोकोत्सव समितीचे अध्यक्ष हुकुमचंद कलंत्री यांची तर संस्थेचे विश्वस्त अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष राजेंद्रकुमार मालपाणी, सहउपाध्यक्ष दिनेशकुमार इन्नाणी, कोषाध्यक्ष ईश्वरप्रसाद डागा, सदस्य कमलकिशोर अग्रवाल, बालकिशन बांगड, संजय बियाणी, सुहास शेट्टी, किशोर भराडिया, आशिष अग्रवाल, चैतन्य भार्गव, रवींद्र व्होरा, संजय भराडिया, आनंद लाहोटी, वंदना इन्नाणी, कुमोदिनी भार्गव आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

राजस्थान विद्यालयातून स्पर्धेला प्रारंभ होऊन मिनी मार्केट, मेन रोड, शिवाजी चौक भुयारी मार्ग, दयानंद कॉलेज गेट, संविधान चौक, यु टर्न घेऊन परत शिवाजी महाराज चौक भुयारी मार्ग, मेन रोड, मिनी मार्केट मार्गे स्पर्धेचा समारोप राजस्थान विद्यालयाच्या प्रांगणात झाला.मॅरेथॉन स्पर्धा ५ व ७ किलोमीटर अंतरासाठी मुले व मुली मोठा व लहान गटात संपन्न झाली.

स्पर्धेचा निकाल

मोठा गट मुलींमधून शिवा द्विवेदी प्रथम, तेजस्वी माने- द्वितिय, भक्ती जाधव – तृतीय तर राजकन्या काळे, पूजा पटाईत, सुमय्या तांबोळी- उत्तेजनार्थ.

मोठा गट मुलांमधून प्रतीक येरटे- प्रथम, ज्ञानेश्वर सूर्यवंशी- द्वितीय, अनिरुद्ध देशपांडे- तृतीय आणि अमित खोसे, स्वराज हांडे, ओंकार खंडेलवाल – उत्तेजनार्थ

छोटा गट मुलींमधून ऋतुजा सोनी- प्रथम, आरोही छत्रे- द्वितीय, आदिती थोरमोटे- तृतीय तर अर्पिता गायकवाड, धनश्री होळे, अंजली जाधव- उत्तेजनार्थ

छोटा गट मुलांमधून आहान सुरवसे- प्रथम, रणवीर थोरमोटे – द्वितीय, क्षितिज सुरवसे- तृतीय आणि देवेश कासले, आर्यन वाडकर, सक्षम शिंदे या स्पर्धकांनी उत्तेजनार्थ क्रमांक मिळवला.

प्रत्येक गटातील विजेत्या सर्व स्पर्धकांना प्रथम ३१००, द्वितीय २१०० व तृतीय ११०० रुपये आणि उत्तेजनार्थ ३ अशी रोख रक्कम आणि सन्मानचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्पर्धा संयोजक चैतन्य भार्गव यांनी केले.

स्फूर्ती गीताने वेधले लक्ष

दरम्यान, पहाटेपासून अशोक हॉटेल परिसरात राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलच्या संगीत विभागाद्वारे तर श्री बंकटलाल लाहोटी इं स्कूल द्वारे दयानंद महाविद्यालय प्रवेशद्वार परिसरात स्पर्धकांचा उत्साह वाढविण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्वरबद्ध देशभक्तीपर गीतांचे गायन केले.

# १०० व्या फिरत्या अ. भा. नाट्य संमेलनात ' रसबहार ' चे ' अर्ध्याच्या शोधात दोन ' नाटक

लातूर : लातूरचे ज्येष्ठ नाट्य – चित्रपट – रंगकर्मी कै. श्रीराम गोजमगुंडे तसेच कै. प्रा. के.एच. पुरोहित सर, कै. रविंद्र गोवंडे सर, कै. हरिभाऊ औरादकर, कै. प्रकाश गोजमगुंडे यांच्या स्मृतीस अभिवादन करून कै. नटवर्य श्रीराम गोजमगुंडे यांच्या ' रसबहार ' नाट्य संस्था निर्मित ' अर्ध्याच्या शोधात दोन ' या दोन अंकी नाटकाचा प्रयोग १०० व्या फिरत्या अ. भा. नाट्य संमेलनात सादर होणार आहे.

कै. शाम फडके लिखित आणि रवी अघाव दिग्दर्शित या दोन अंकी कौटुंबिक नाटकाचा प्रयोग १०० व्या फिरत्या अ. भा. नाट्य संमेलनात रविवार, दि. ११ फेब्रुवारी २०२४ रोजी सायंकाळी सात वाजता मार्केट यार्डातील दगडोजीराव देशमुख सभागृहात सादर होणार आहे. या नाटकात प्रमुख भूमिकेत अजय गोजमगुंडे, सौ. सुवर्णा बुरांडे, श्रीमती मंजुषा पाठक, अजय कातपुरे, अविष्कार गोजमगुंडे, सुधीर बिर्ले, राजीव गड्डीमे हे कलाकार आहेत. प्रकाश योजना सुधीर राजहंस, नेपथ्य नंदकुमार वाकडे, मेकअप व वेषभुषा भारत थोरात सर, रंगमंच व्यवस्था उदय गोजमगुंडे, प्रवीण गोजमगुंडे, रोहित साळवे यांची आहे.

या नाट्य प्रयोगास लातूर शहरातील नाट्य रसिकांनी वेळेवर उपस्थित राहून नाट्य प्रयोगाचा आनंद घ्यावा व कलाकारांचाही आनंद द्विगुणित करावा,असे आवाहन रसबहार नाट्य संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

# आज रेणापूर येथे कुस्ती स्पर्धाचे भव्य दिव्य नियोजन; आ. कराड यांच्या हस्ते विविध स्पर्धेचे बक्षीस वितरण

लातूर :- भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने नमो चषक २०२४ च्या माध्यमातून ११ फेब्रुवारी रविवार रोजी रेणापूर येथे नामांकित मल्लांच्या नमो केसरी कुस्ती स्पर्धा आयोजित आल्या असून लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील विविध क्रीडा स्पर्धेचे बक्षीस वितरण भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते होणार आहे. कुस्ती स्पर्धेचे मराठवाड्यात पहिल्यांदाच भव्य दिव्य नियोजन करण्यात आले आहे तेव्हा मतदार संघातील भाजपा लोकप्रतिनिधी पदाधिकारी कार्यकर्त्यांसह खेळाडू आणि क्रीडा प्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे.

नमो चषक २०२४ सर्वत्र मोठ्या प्रमाणात होत असून विविध स्पर्धेच्या माध्यमातून तरुणात उत्साहाचे आणि नवचैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे. लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील रेणापूर आणि लातूर दोन तालुक्यात



क्रिकेट, हॉलीबॉल, खो-खो, कबड्डी, कॅरम विविध क्रीडा स्पर्धांचे मोठ्या प्रमाणात झाल्या. अंतिम फायनल स्पर्धा विधानसभा मतदार संघाच्या होत आहेत. तर नामांकित मल्लांच्या कुस्ती स्पर्धा रेणापूर येथे रविवारी दुपारी आयोजित करण्यात आल्या असून या कुस्ती स्पर्धेचे नियोजन मराठवाड्यात प्रथमच भव्य आणि दिव्य स्वरूपात करण्यात आले आहे. भारदस्त आणि जबरदस्त कुस्ती स्पर्धा पाहण्याची संधी संयोजकाच्या वतीने उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या सर्व स्पर्धांचा बक्षीस वितरण सोहळा ११ फेब्रुवारी २०२४ रविवार आज सायंकाळी ५ वाजता रेणापूर येथील शिवाजी महाविद्यालय शेजारी मेन रोड येथे भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते होणार आहे. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्ह्याचे खासदार सुधाकर शृंगारे, भाजयूमोचे प्रदेशाध्यक्ष राहुल लोणीकर, भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, भाजयुमोचे प्रदेश सचिव ऋषिकेशदादा कराड यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

नमो केसरी कुस्ती स्पर्धा आणि विविध स्पर्धेतील यशस्वी खेळाडूंचे बक्षीस वितरण कार्यक्रमाची जय्यत तयारी करण्यात येत असून या सोहळ्यास लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील विशेषता रेणापूर शहरासह तालुक्यातील भारतीय जनता पार्टीच्या विविध आघाडी मोर्चासह सर्व पदाधिकारी लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांनी त्याचबरोबर खेळाडू आणि क्रीडा प्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे.

# ज्येष्ठ पत्रकार कबीर यांचा सन्मान

**लातूर, : ज्येष्ठ पत्रकार मुहम्मद मुस्लिम कबीर यांना लोकगौरव राष्ट्रीय एकात्मता परिषद मुंबई व टीएमजी क्रिएशन मुंबई यांच्या वतीने देण्यात येणारा टीएमजी पीस ॲम्बेसेडर आयकॉनिक पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. त्याबद्दल महाराष्ट्र विकास आघाडीचे संस्थापक अध्यक्ष ॲड. आण्णाराव पाटील यांनी त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला.**

लोकगौरव राष्ट्रीय एकात्मता परिषद, मुंबई आणि ढचऋ क्रिएशन मुंबई यांच्या वतीने गेल्या पाच वर्षांपासून जीवनाच्या विविध क्षेत्रात अमूल्य सेवा आणि कामगिरी बजावलेल्या व्यक्तींना राज्य/राष्ट्रीय स्तरावर टीएमजी पीस ॲम्बेसेडर आयकॉनिक पुरस्कार प्रदान करण्यात येतो. यंदाचा हा पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार मुहम्मद मुस्लिम



कबीर यांना त्यांच्या पत्रकारितेतील आणि साहित्यिक सेवेची दखल घेऊन हा राष्ट्रीय स्तरावरील टीएमजी पीस ॲम्बेसेडर आयकॉनिक ॲवॉर्ड देऊन गौरविण्यात आले. याबद्दल महाराष्ट्र विकास आघाडीचे संस्थापक अध्यक्ष ॲड. अण्णाराव पाटील यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान केला. यावेळी ज्येष्ठ पत्रकार अब्दुल समद शेख यांच्यासह मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते

# चौकस बुद्धीने विश्वाकडे पाहण्याचा दृष्टिकोन वैज्ञानिकांकडून आत्मसात करावा - डॉ.आण्णाराव चौगुले

**लातूर : इरा रेमसेन यांना आदरांजली वाहत असताना पहिल्या औद्योगिक क्रांतीनंतर या वैज्ञानिकांनी विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवून आणले.गोड पदार्थांचे औद्योगिक उत्पादन करताना आज साखरेऐवजी सॅकरिन वापरले जाते,जे डायबेटिस असणाऱ्या रुग्णांना दिलासा देणारे आहे,त्याचबरोबर साखरे कितीतरी पटींनी गोड असल्याने कमी खर्च लागत असल्याने हे सर्वत्र वापरले जाते.या सॅकरिनचा शोध हा रेमसेन यांची चौकस बुद्धीचा परिणाम असून विद्यार्थ्यांनी त्यापद्धतीने विश्वाकडे पाहण्याचा दृष्टिकोन ठेवावा,असे प्रतिपादन औद्योगिक रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ.आण्णाराव चौगुले यांनी केले.**

येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.१० फेब्रूवारी २०२४ रोजी जैवतंत्रज्ञान विभागाच्या वतीने वैज्ञानिक ' इरा रेमसेन ' यांची १७८ वी जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड,औद्योगिक रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ.आण्णाराव चौगुले, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ.चंद्रशेखर स्वामी,प्रा. राहुल जाधव व जैवतंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ.कोमल गोमारे यांनी वैज्ञानिकाच्या प्रतिमेस वंदन करून केली.

वैज्ञानिक इरा रेमसेन यांची विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील कारकीर्द बी.एस्सी.बीटी तृतीय वर्षाची विद्यार्थीनी प्रतिक्षा सुपेकर यांनी थोडक्यात प्रकाशझोतात आणली.तिने यावेळी रेमसेन यांची रसायनशास्त्र विषयाप्रती असणारी आवड व निष्ठा याबद्दल सांगताना,अनावधानाने सॅकरिन संयुगाचा शोध कसा लागला याबद्दल माहिती सांगितली.

कार्यक्रमावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासात असलेल्या प्रत्येक गोष्टीचे बारकाईने निरीक्षण करण्याचा सल्ला दिला.कारण या सूक्ष्म गोष्टीचे पुढे चालून नावीन्यपूर्ण संशोधनाचे रूप घेत असतात,असे सांगितले.

इरा रेमसेन हे एक अमेरिकन रसायनशास्त्रज्ञ होते,जे त्यांच्या सेंद्रिय रसायनशास्त्र आणि रासायनिक शिक्षणातील योगदानासाठी प्रसिद्ध होते.न्यूयॉर्क शहरात जन्मलेल्या, रेमसेनने कॉलेज ऑफ द सिटी ऑफ न्यूयॉर्कमध्ये रसायनशास्त्राची आवड जोपासली आणि नंतर पीएच.डी. जर्मनीतील गॉटिंगेन विद्यापीठातून पूर्ण केली.जॉन्स हॉपकिन्स विद्यापीठात सामील होण्यापूर्वी विल्यम्स कॉलेजमध्ये अध्यापन करत,त्यांनी शैक्षणिक कारकीर्द सुरू केली,जिथे त्यांनी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागाची स्थापना करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. रेमसेन हे १८७९ मध्ये सॅकरिन या पहिल्या कृत्रिम स्वीटनरच्या अपघाती शोधासाठी प्रसिद्ध आहेत, ज्याने अन्न उद्योगात क्रांती केली. त्याच्या संशोधनाच्या पलीकडे, रेमसेन हे रासायनिक शिक्षणासाठी उत्कट वकील होते, विद्यार्थ्यांसाठी प्रयोगशाळेतील अनुभवांना प्रोत्साहन देत होते. अध्यापन आणि मार्गदर्शनासाठीच्या त्याच्या समर्पणाने रसायनशास्त्राच्या क्षेत्रावर कायमस्वरूपी प्रभाव टाकला, ज्यामुळे त्याला अमेरिकन विज्ञानातील अग्रगण्य व्यक्ती म्हणून ओळख मिळाली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड व उपप्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमासाठी जैवतंत्रज्ञान विभागातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.तसेच औद्योगिक रसायनशास्त्रचे विद्यार्थी गायकवाड रणजीत,जाधव रुपेश, कलमे पवन,बाचपल्ले ऋषिकेश, जैवतंत्रज्ञान विद्यार्थी मंचचे सदस्य प्रा.स्वरूप गावकरे, प्रा.श्रीनिवास कुलकर्णी,संयुक्त सचिव जानवी अंबर,सदस्य विशाखा उफाडे, उत्कर्षा पाटील, विद्यार्थीनी प्रतिनिधी पर्णवी ढवारे,तसेच विभागातील बी.एस्सी.प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाचे विद्यार्थी तसेच औद्योगिक रसायनशास्त्र विभागाचेही विद्यार्थी उपस्थित होते.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी) RNI No.: - MAHMAR/2017/72894